म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# नीतिविवाहचंद्रिका.

## प्रस्तावना.

पुस्तक लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असून त्यांतहि प्रथमच धर्मसंबंधी विषय हातीं धरला आहे; तेव्हां मूळ उद्देशा प्रमाणें पुस्तक लोकमान्य व कार्यकर्तें होईल न होईल ह्या काळजींत मी राहीन, हें स्वाभाविक होय. तथापि, शुद्ध सुधारणेच्छु आणि विद्वान लोकांविषयीं मी खात्रीनें आशा बाळगितों, कीं, ते " हंसन्याया प्रमाणें " दुधपाण्यांचा भाग पृथक् काढून "सार" तेवढें घेऊन मला उत्तेजन व मदत देतील.

प्रस्तावनेंत ह्या शिवाय जे प्रकार दर्शवायाचे, ते प्रकार आरंभीं ग्रंथकर्त्यांचा उद्देश व पुढें पुस्तकांतील विषय वांचून सुज्ञवाचकांच्या सहज ध्यानीं येऊं शकतील ह्मणून त्या विषयीं येथें कांहीं पाल्हाळ वाढवीत नाहीं.

रं० भ० मां.

# ग्रंथकर्त्याचा उद्देश.

आपल्या देशांत हल्लींच्या राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीपासून जीं थोडीं बहुत फायद्यांचीं कलमें निदर्शनास आलीं आहेत त्यांत विद्यावृद्धि हें पहिलें कलम म्हणलें पाहिजे. आलीकडे सुमारें तीस वर्षांत तर विद्यावृद्धिप्रीत्यर्थ अनेक उपयुक्त विषयांवर अनेक तऱ्हेचीं सुरस पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून तद्द्वारें अनेक लोक ज्ञान संपन्न होऊन तज्जनित सुखाचा उपभोग घेत आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. विद्वानांच्या श्रमें करून आजपर्यंत जे ग्रंथ उपलब्ध झाले आहेत, तेणेंकरून व्याकरण, न्याय, अलंकार, छंद, रसायन, भूगर्भ इत्यादि शास्त्रीय विषयांची लोकांस बरीच माहिती होऊन ते त्या विषयांत सुजाण झाले आहेत. हे अत्यंत उपकार विद्वान ग्रंथकर्त्यांचे आम्हा लोकांवर आहेत, असें म्हटल्यावांचून मात्राने राहवत नाहीं. मात्र नीतीच्या संबंधानें पाहूं जातां त्या विषयाकडे एतद्देशीय ग्रंथकर्त्यांचें विशेष लक्ष पोंचलेलें नाहीं असें दिसतें. त्यामुळें नीतीचा बोध व्हावा तसा आम्हा लोकांस व वि-

शेषेंकरून मुलांस होत नसल्यामुळें मुलांस आ-चरणांत ज्या चुका होतात त्या आपल्या ध्यानीं येऊं शकत नाहींत. कोणीही मनुष्य इतर विषयांत कितीहि समंजस असला तरी नीतिसंपन्न झाल्यावांचून त्यास खऱ्या सुखाची प्राप्ति होणें नाहीं, हा सिद्धांत आहे. मी खात्रीनें लिहूं शकतों, कीं, नित्याचारांत ज्या चुका होतात, त्या इतर विषयज्ञानानें कधींहि सुधारतां येणार नाहींत. म्हणून कोणत्याहि ज्ञानाची प्राप्ति करून घेणें तर प्रथम नीतिद्वारें घ्यावी, हेंच उत्तम होय.

प्रपंचसंबंधी दृष्टीनें पाहतां प्रपंच सुखाची इच्छा बाळगीत नाहीं, असा पुरुष विरळा. जगांतील मनुष्यवस्तीचा अतिशय मोठा भाग विशेषें करून प्रपंचांत गुंतलेला असून नेहमी सुखच वांछित आहे. म्हणून प्रापंचिकांना तर नीतिवांचून दुसरा कोणताच जगांत सुखप्राप्तीचा मार्ग नाहीं. जगांत अत्यंत मोलाची, अत्यंत गुणाची, सर्वांस संग्रह करण्याची, आणि सुख देणारी अशी चीज नीतीवांचून दुसरी नाहीं. हा सुज्ञांचा

सिद्धांत आहे. म्हणून मी आणिक एकवार लिहितों, कीं, मनुष्यास विद्वान व सुशिक्षित होण्यास जरी दुसरे विषय असणें हें अवश्य आहे; तथापि नीतिसम्पन्नता सर्वांस अगोदर पाहिजे तरच ह्या जगीं सुखप्राप्ति होईल.

मित्रहो, नीतिवांचून प्रपंचांत सुख नाहीं. हा तर सिद्धांत आहेच. परंतु आपल्या लोकांत नीतियुक्त प्रपंच होत आहेत अशीं घरें शोधल्यास किती मिळतील बरें? जिकडे पहावें तिकडे बहुधा स्त्रीपुरुषांत बंधूबंधूंत, पितापुत्रांत, नीतीच्या जागीं अमर्यादा, उन्मत्तता, मत्सर इत्यादि दुष्ट गुणांचें मात्र प्राबल्य दृष्टीस पडेल!! ज्या मातुश्रीनें नऊ महिने पर्यंत उदरीं वागविलें त्या मातुश्रीस पुत्राकडून कां अपशब्दांचा भडिमार आणि केव्हां केव्हां पादताडनादि पुष्पवृष्टी व्हावी? हर हर! ह्या करितां कां माउली पुत्र प्रसवते? चौर्यव्यभिचारादि कृत्यें करून दुर्लौकिक मिळवावा म्हणून कां पिता पुत्राचें लालनादि कोड करितो? सुज्ञ वाचकहो, प्रापंचिकांच्या कुटुंबांत ही फटफजिती कां-

वरें? अर्थात् उत्तर हेंच कीं, कुटुंबांत नीतीचा अभाव! स्त्रीपुरुषांच्या संबंधांत देखील हीच स्थिति आढळते. प्रपंचामध्यें नवऱ्यास स्त्री आणि स्त्रीस नवरा ही एकमेकांना जरी अत्यंत सुखाची स्वयंभू ठेव आहे, तथापि ज्या स्त्रीपुरुषांत नीतीचा अभाव आहे, तेथें सुखाच्या ठिकाणीं अत्यंत दुःखाची ठेव आहे हें प्रमाणपूर्वक दाखवितां येईल. स्त्रीपुरुषांत जर नीतीचा अभाव असेल तर संततींतहि सामान्यतः अभावच असणारा आहे. म्हणून नीतिपैकीं स्त्रीपुरुषांच्या संबंधाचा विचार येथें प्रथम केला आहे.

स्त्री आणि पुरुष हे दोघेहि नीतिसंपन्न असले पाहिजेत तरच ते परस्परांना सौख्य देऊं शकतात नाहीं तर सौख्याच्या जागीं संताप देतात. सुज्ञ वाचकहो, लिहिण्यास काय बाध आहे कीं, हल्लींची जी ही निकृष्ट दशा आपल्या लोकांस आली आहे. ती मुख्यत्वें वर लिहिलेल्या कारणामुळेंच मी असें लिहूं शकतों कीं, देशांत सहस्रावधि गर्भपात, बालहत्या, स्त्रीहत्या, पुरुषहत्या, आ-

णि व्यभिचारादि भयंकर पापकर्मे घडूं शकतात तीं सर्व नीति नसल्यामुळेंच. पातिव्रत्य भंग करून स्त्रिया दुर्धर कामव्याघ्राच्या तडाक्यांत सांपडतात, आणि व्यभिचार करितात. त्यासहि कारण हेंच. पुरुषाचें चित्त घरीं न राहतां नीच स्त्रियांकडे ओढा घेऊन अखेर फसलें जातें. त्या गोष्टीसहि मूळ कारण हेंच. अरेरे! इतकें दुःखदायक सदरहू कारण असतां त्याच्या बंदोबस्ताबद्दल कांहींच तजवीज होऊं नये, ही किती दिलगिरीची, दुःखाची, आणि आपल्यांतील सुज्ञांस दोष ठेवण्यासारखी गोष्ट आहे बरें?

देशबांधवहो असे प्रकार कां घडतात, ह्मणून जर प्रश्न निघेल त्यासाहि हेंच उत्तर कीं, कुटुंबांत नीतीविषयीं ज्ञानाचा अभाव. जर नीतीचें ज्ञान होईल तर अशा अविचाराच्या गोष्टी कधीं मनुष्यांपासून सहसा घडणार नाहींत. स्त्रीस व पुरुषास जर खरें परस्पर आपलें काय नातें आहे, कशा अधिकाराचें आहे, कसें वागलें

पाहिजे, पाप पुण्य ह्मणजे काय, परस्परांच्या गांठी पडल्या आहेत, त्या किती महत्वाच्या आहेत; परस्परांत देव, द्विज, अग्नि, सूर्य इत्यादि देवतांच्या साक्षीनें काय करार झाले आहेत, ते मोडले असतां एकमेकांचें कार्य नुकसान होईल इत्यादि गोष्टी जर खरोखर रीतीनें समजून नीतीचें ज्ञान होईल तर पुरुषाकडून किंवा स्त्री कडून सहसा वांकडें पाऊल पडणार नाहीं. परंतु हें ज्ञान होणें तें लहानपणापासून होत गेलें पाहिजे ह्मणजे परस्पर प्रेम वाढणारें आहे. नाहीं तर आरंभीं मक्षिकापात झाल्यावर मग पुढें पश्चात्ताप किंवा ज्ञान होऊन काय उपयोग होईल?

मित्रहो, वेदाज्ञेप्रमाणें देव, द्विज, अग्नि इत्यादिकांच्या ससाक्ष्य विवाहींत ज्या आपण दुर्धर आणि अलोट प्रतिज्ञा करितों, त्या विवाहानंतर नित्य आपल्या स्मरणांत असतात काय? असल्या तरी त्याप्रमाणें आचरण आपल्याकडून राहतें काय? कोणत्या अर्थाच्या, कशा प्रकारच्या, कोणत्या हेतूकरितां प्रतिज्ञा आपण करितों त्यां-

विषयीं विवाहवेळीं किंवा त्यानंतर आपण समजुतीनें विचार करितों काय? जर आपण अशा महत्वाच्या मुद्याविषयीं पूर्वी आणि पुढें नेहमींच अजाण असतां, व प्रतिज्ञेउलट क्रिया करून दोषास पात्र होतों; तर ही केवढी आपल्या शहाणपणाची प्रौढि! ह्यावरून विचारांतीं निश्चय होतो कीं, विवाहसंबंधी सर्व प्रकारचें खरें नीतियुक्त ज्ञान जर पूर्वींच वधूवरांत असेल, किंवा होईल अथवा निदान विवाहानंतर जरी होईल, तरी खचीत खचीत स्त्रीपुरुषांच्या आचरणांत प्रेम, नीति, मर्यादा आणि परस्परांच्या सुखासंबंधी सर्व प्रकारची सुधारणा निरंतर राहील; यांत संशय नाहीं. आपल्यां लोकांत मूळ "गतानुगतिकोलोको न लोकःपारमार्थिकः" अशा प्रकारें आचरणाची चाल पडल्यामुळें सार्थ क्रिया करण्याचें बहुधा मानसिकच झालें आहे. ही किती दुःखाची गोष्ट! कोणतीहि क्रिया कोणाकडून "सार्थ" म्हणजे समजून उमजून झाल्यावर अगर जें कृत्य आपणाकडून झालें, त्याचें ज्ञान झाल्यावर मग त्याकडून

सहसा त्या उलट आचरण घडूं शकणार नाहीं. कोणतीहि "तत्वबोध" रहित क्रिया व्यर्थ आहे, हें सांगणें नकोच. आपल्याकडून विवाहादि महत्वाच्या क्रिया होतात, त्या सार्थ ह्मणजे आपल्याशीं समजूतपूर्वक होतात काय? आपण लग्नादि क्रिये करून गृहस्थाश्रमी कां व्हावें. स्त्री कशाकरितां करावी, स्वस्त्री खेरीज इतर स्त्रीशीं कां न प्रेम ठेवावें, त्याचप्रमाणें स्त्रियांनीं मुख्य पातिव्रत्य धर्मानेंच कां वागावें, इत्यादि गोष्टींचें ज्ञान जर उभयतांस होईल तर मग सहसा नित्याचारांत भूल होईल काय? नाहींच नाहीं. ह्या करितां तें ज्ञान स्त्रियांस, पुरुषांस व वधूवरांस व सर्वांस झालें ह्मणजे प्रपंचांत सुखाची वृद्धि होईल; असा माझा अभिप्राय आहे. आणि ह्या अभिप्रायाचें कांहीं तरी आपल्याकडून सार्थक्य व्हावें, असेंहि माझ्या मनांत फार दिवस घोंटाळत होतें, परंतु उपाय काय? विषय पडला धर्मसंबंधाचा, गहन आणि प्रत्येक ठिकाणीं अडचणीचा, त्यांत स्वतः मजला शास्त्रीय विषयांत गम्य कमी, तेव्हां सहजच बहुत

दिवस ह्याच घोंकणीच्या खालीं निघून गेले. शेवट असा निश्चय झाला कीं, कसेंहि होवो, आणि कांहीं होवो, परंतु जेणेंकडून सर्व घराण्यांतील वधूवरांस व स्त्रीपुरुषांस आपआपल्या अधिकारांचें व प्रीतीचें ज्ञान होऊन त्यांचा संसार सुखानें चालावा व वेदाज्ञेप्रमाणें अग्नि, देव, द्विज सूर्य इत्यादि देवतांच्या साक्षीनें जे एकमेकांचे करार ( प्रतिज्ञा ) लग्नसमयीं होतात त्या संबंधानें वधूवरांस सर्व प्रकारच्या अर्थाचें ज्ञान होईल; स्त्रीपुरुषांच्या आचरणांत विशेष मर्यादा आणि प्रीति उत्पन्न होऊन अखेर तीं दंपत्यें ह्या लोकीं लौकिकास आणि परलोकीं ईश्वरी कृपेस पात्र होतील, अशा प्रकारच्या विवाहसंबंधी विषयावर विद्वानांच्या साहाय्यानें सप्रमाण ग्रंथ लिहून तो देशांतील सुधारणेच्छु जनास सादर करावा.

अखेर ह्या निश्चयाच्या जोरावर हा नीतिविवाहचंद्रिका नामें ग्रंथ लिहून यथाशक्ति ( ओनामा ) सुज्ञांपुढें आणिला आहे. ग्राह्याग्राह्याचा विचार व्हावा.

मी आशा बाळगितों कीं, सदरील ग्रंथ मुख्यत्वेंकरून होतकरूं वधूवरांस, त्यांच्या मातापितरांस, उपाध्यायास, शिक्षकास व सर्व स्त्री पुरुषादिकांना प्रकाश ( उपदेश ) देऊन आझे हेतु पूर्ण करील.

रं. भ. मां.

श्री

# नीतिविवाहचंद्रिका.

## यजुर्वेद.

प्रथम मुलगा अगर मुलगी लग्न करण्यास योग्य झाली ह्मणजे आईबापांस काळजी उत्पन्न होऊन ते आपल्या कुलशीलांस योग्य अशा स्थलांची निवड करूं लागतात.

## घटित व गणमैत्री.

मुख्यत्वें वस्तुलाभ पाहण्याची चाल स्वाभाविकच आहे. त्याप्रमाणें मुलगा व मुलगी रूपानें व गुणानें सांग पाहावयाचें करून नंतर गोत्रशुद्धि म्हणजे मुलाकडील गोत्र, प्रवर, मातुलगोत्र सावत्रमामा एक किंवा अधिक असल्यास त्यांचीं तितकीं गोत्रें, वधूपित्याच्या गोत्राशीं सांगजुळतीं पाहून त्यापुढें गणमैत्री व प्रीतियोग इत्यादि इष्ट प्रकारचें सर्व जुळतें घटित पाहतात. आणि नंतर

तिथिनिश्चयादि कृत्यें करितात. अशी पुर्वापार शिष्टसांप्रदायिक रूढि पडली असून सर्वानुमतें ती उक्त ठरली आहे.*

## वधूवयाविषयीं विचार.

शास्त्राच्या मताप्रमाणें मुलीचें वय साडेसात वर्षांवर म्हणजे आठ वर्षांचें पाहिजे. त्यापूर्वी ती लग्नास पात्र असत नाही असा आधार आहे. कारण कीं, " मुलगी जन्मतांच प्रथम अडीच वर्षें तिजवर चंद्राची सत्ता असते, पुढें अडीच वर्षें सूर्याची, आणि शेवटीं अडीच वर्षें अग्नीची " अशा कारणामुळें ती साडेसात वर्षें लग्नास पात्र होत नाहीं.†, गृहाकारिका वगैरे ग्रंथांवरून दहा वर्षांपर्यंत लग्नास योग्य काल आहे असा आधार आहे.

---

* हें घटित पाहण्याचें कारण इतकेंच आहे कीं, " कधीं वधूवरांच्या प्रीतिसंबंधांत अंतर येऊं नये " व संतति, धन, आयुष्याची अनुकूलता असावी.

† आठव्या वर्षापासून ऋतुकालपर्यंत म्हणजे अकराव्या वर्षापर्यंत लग्न करण्यास शास्त्रांत कोठें हरकत आढळत नाहीं.

## वरवयाविषयीं विचार.

मुलाच्या वयाविषयीं प्रमाण आहे तें असें:—

**वर्षैरेकगुणांभार्यामुद्वहेत्त्रिगुणःस्वयं** स्मृति

अर्थ—वधूचें वय जितक्या वर्षांचें असेल, त्याच्या-तिप्पट वय वराचें असावें. शास्त्रांत असें सांगितलें आहे; परंतु व्यवहारांत नियम दिसण्यांत येत नाहीं.

## वचनसुपारी व तिथिनिश्चय.

वर लिहिल्याप्रमाणें स्थळविचार झाल्यावर मग वचनसुपारी व तिथिनिश्चय करावा. ह्या कृत्यांस ज्योतिषशास्त्रीं आधार आहे. वचनसुपारीचा विधि असा आहे कीं, मुलीच्या बापाच्या येथें वरपित्यानें आपल्या इष्टमित्रांसह जाऊन तेथें वधूपित्याकडील सर्व मंडळींत अमक्या तिथीस निश्चयें लग्न लावावयाचें असा नेम ठरवावा. प्रथम वधूपित्यानें ज्योतिषशास्त्र्यास भावी वधूवरांस कोणती लाभदायक तिथि आहे, हें पाहण्यास सांगावें. त्यांनीं तिथि स-

गितली म्हणजे त्या तिथीस सर्वानुमतें लग्न व्हा- वावयाचें ठरवून वरपित्यानें वधूस कुंकूं लावून चिरडी चोळी द्यावी, व हातीं खाऊ द्यावा, म्ह- णजे खडेसाखरेचा पुडा तिच्या हातीं देऊन त्यां- तील थोडा अंश तिच्या मुखांत घालावा. नंतर जोश्यास वगैरे असलेल्या भिक्षुक ब्राह्मणांस भु- यसी दक्षिणा देऊन इतर इष्टांचा पानसुपारी, अत्तरगुलाव देऊन शिष्टाचार करावा, म्हणजे तिं- थिनिश्चय विधि अथवा वचनसुपारी झाली.* ति- थिनिश्चय झाला म्हणजे उभयपक्षांकडे साहित्यास लागतात. हळदकुंकूं हे पदार्थ मांगलिक अ- सल्यामुळें सर्व साहित्यापूर्वी ते आणतात; नंतर मंडपस्थापना करून उदगनेर व कुलाचार वगैरे करितात तो विधि असाः—

* वचनसुपारीस व तिथिनिश्चयास शूद्रादिकांत 'साखरपुडा' म्हणतात. वचनसुपारीचें माहात्म्य गुजराथ देशांत विशेष आहे. वचनसुपारीस गुजराथेंतील इतर जातींत 'मागणी' असेंहि म्हणतात. ही मागणी त्या लोकांत बारा वर्षे देखील अगोदर करून ठे- वितात.

## गडगनेर व कुलाचार.

घरच्या देवास नैवेद्य करून आपल्या इष्ट व शरीरसंबंधी ह्यांस जेवणास बोलावितात. त्या दिवशीं मुलास अगर मुलीस घरचा आहेर होतो. घरीं हा प्रकार एकवार झाल्यावर इष्टमित्रांकडून व आप्तसंबंधी ह्यांकडूनहि मग एकएक गडगनेरा-चा व आहेराचा प्रकार होण्याचा चालू होतो.‡ घरचा गडगनेर होतो, त्याच दिवशीं बहुधा कु-लस्वामीस, कुलदेवतेस व मुख्यत्वें विघ्नहर्त्या श्री मंगलमूर्तीस लग्नास येण्याच्या निमंत्रणाची अ-क्षत देण्याचा समारंभ करितात. तो प्रकार असाः—

## अक्षतसमारंभ.

सर्व समाजासह वाजतगाजत आनंदानें जा-ऊन प्रथम गणपतीस व मागून कुळस्वामी, कु-लदेवता, इतर ग्रामदेवता ह्यांस अक्षत देऊन मग

‡ गडगनेर व आहेर होण्याचें मान संबंधिकांच्या संख्येवर व, यांचें कार्य असेल, त्याच्या अनुकूल कालावर अवलंबून आहे.

प्रथम पांच ब्राह्मणांच्या घरीं अक्षत द्यावी, आणि नंतर सर्व आप्तसंबंधिक व इष्टमित्र ह्यांकडे द्यावी.*

## सीमांतपूजन.

हा विधि असा आहे कीं:— वर परगांवीं असेल तर तेथून वऱ्हाडासहित आपल्या गांवच्या सीमेंत येतांच वधूपित्यानें स्त्रीपुरुषांच्या समाजासह जाऊन आनंदपूर्वक वाजतगाजत आणावा. सीमेंत आल्यावर तेथें प्रथम यथाप्रयोग गणपतिपूजन करून मग वराचेंहि पादप्रक्षालनादि करून गंधाक्षतांनीं यथासांग पूजा करावी. वरास शेला, पागोटें, पायांतील जोडा इत्यादि आहेर वधूपित्यानें करावा; तसेंच वधूमातेनेंहि वरमातेचे

* इष्टसंबंधी कोणी बाहेरगांवीं असल्यास त्यास मंगलदायक कुंकवादि चर्चून पत्रिका पाठवितात, त्यास कंकुंच्या अथवा लग्न चिठ्ठया ह्मणतात, व अक्षत देण्यांतील अर्थ असा आहे कीं, " अमक्याचा मुलगा अमक्याची मुलगी ह्यांचा विवाह, अमुक दिवशीं अमुक वेळेस योजिला आहे. तरी आपण येऊन कार्यसिद्धि करावी. " ह्मणजे ह्यांतील मतलब इतकाच कीं, तुमच्या मंदतीनें व महशूरपणानें व साक्षीनें यथाविधि लग्न व्हावें.

पाय धुवावेत, हळदीकुंकवादि देऊन ओंटी भरा-वी, शक्ति असल्यास आहेर करावा, नंतर उपाध्यायास व इतर भिक्षुकांस भुयसी दक्षिणा देऊन गृहस्थांस पानसुपारी अत्तरादि देऊन बहुमान करावा. नंतर वाजतगाजत समारंभानें सर्व वऱ्हाडासहित वर जानवसाघरीं आणून पोंचवावा. जानवसाघरीं लागणाऱ्या सर्व साहित्याची व फराळाची इत्यादि तजवीज वधूपित्याकडून असावी. वर एकाच गांवांत असेल तर सदरहू सीमांतपूजनाचे प्रकार वराच्या घरींच होतात, व कोठें कोठें देवालयांतहि होतात.

## घाणा भरणें.

त्याच दिवशीं अगर दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं सुवासिनी स्त्रिया वधूस घेऊन घाणा भरतात. मग मुलीस हळदी लावून मांगलिक स्नान घालितात. पिंवळें केलेलें वस्त्र नेसावयास देतात. *वधूस तें वस्त्र कच्छहीन नेसवितात. तसेंच पिंवळी का-

* हें पिंवळें वस्त्र कन्यादानसमयीं वराकडून वस्त्र मिळेपर्यंत असतें.

तचोळी तिला लेववून कपाळीं मळवट भरतात. इतकें कृत्य झाल्यावर वधूकडे देवप्रतिष्ठा बसवितात. नंतर वधूस लाविलेली हळद वराकडे पाठवितात. तीस उष्टीहळद ह्मणतात. उष्टीहळदीचा विधि असा आहे.

## उष्टीहळद.

मुलीस हळदी लावून नंतर ती हळद‡ वाजतगाजत समारंभानें सुवासिनी स्त्रिया वराकडे घेऊन जातात. वधू कडून हळद येण्यापूर्वी वरगृहीं धाणा वगैरे भरून तयारी जाहली असते. ती आलेली उष्टीहळद मोठ्या सोहळ्यानें सुवासिनी स्त्रिया वराच्या अंगास लावितात. ज्या स्त्रियांनीं ही हळद वधू कडून आणिली असेल त्याच स्त्रियांनीं ती वरास लावून मग मांगलिक स्नान घालावें असा प्रचार आहे. वरास मळवट भरतात. वधू कडून आलेल्या स्त्रियांस मग

‡ ह्या हळदीस उष्टीहळद ह्मणण्याचें कारण इतकेंचकीं, ती मुलीस अगोदर लावून मग मुलास आणतात, ह्मणून उष्टीहळद.

वराकडील स्त्रिया हळदीकुंकू देऊन ओटी भरतात. नंतर वराकडे देवप्रतिष्ठा बसवितात. त्यापूर्वी बसविण्याचा अधिकार नाहीं.

## देवप्रतिष्ठा.

वधूकडील देवप्रतिष्ठा पूर्वींच बसते हा प्रकार वर सांगितला आहेच. आतां येथें वराकडील देवप्रतिष्ठा बसते. देवप्रतिष्ठेचा विधि लांबवून सांगण्याचें येथें तादृश कारण नाहीं; कारण, त्यासंबंधी सर्व तयारी उपाध्यायाकडून असून यजमानास त्यांत कांहींच विशेष खटपट किंवा मन घालावें लागत नाहीं; उपाध्याय सांगेल तसें पूजन वगैरे करणें इतकेंच यजमानाकडे विशेष काय तें आहे.

देवप्रतिष्ठा बसविण्याचें कारण असें आहे कीं, "योजिलेलें कार्य निर्विघ्न शेवटास जावें". उदाहरण, वरमाता किंवा वधूमाता अस्पर्श झाल्यास देवप्रतिष्ठा बसल्यावर मग तो दोष धरण्याचें कारण नाहीं, खुशाल कार्य होऊं द्यावें; मात्र त्याब-

द्दल-अशिांति, हेरंबशांति इत्यादि शान्या करा-ण्यात असें शास्त्रांत सांगितलें आहे.

॥ नांदीश्राद्धेकृतेयस्य ॥
॥ भार्यारजस्वलाभवेत् ॥
॥ विवाहेनैवदोषःस्यात् ॥
॥ दोषःस्यात्मौंजिबंधने ॥

अर्थ—नांदीश्राद्धानंतर बायको रजस्वला झा-ल्यास लग्नकार्य होण्यास बाध नाहीं मुंजीस मात्र आहे.

त्याचप्रमाणें उभय ह्मणजे वधूवरांकडील गोत्र-जांस देवप्रतिष्ठेनंतर जननाशौच अगर मृतशौ-च आल्यास संकटीं लग्नकार्य होण्यास बाध नाहीं. अशाविषयीं शास्त्रांत प्रमाण आहे. दे-वप्रतिष्ठा बसण्यापूर्वी अशौच आल्यास मात्र कार्य करणें स्थगित केलें पाहिजे. अस्तु, ह्याविषयीं खुला-शाचीं प्रमाणें मुहूर्तमार्तंड व निर्णयसिंधू वगैरेंत आहेत.

देवप्रतिष्ठा झाल्यावर तिचें उत्थापन होईपर्यंत

पंचमाहायज्ञ करण्यास अधिकार नाहीं; असें शास्त्र प्रमाण आहे. मुलास अगर मुलीस मांगलिक स्नान घालून पित्यानें त्यास जवळ घ्यावें; आणि संकल्प करावा. गणपतिपूजन करावें. पुढें पुण्याहवाचन§ करावें. आचार्य वगैरे उपाध्यायांनीं पुण्याहवाचनासमयीं पूजिलेल्या कलशांतून उदक घेऊन वधू अगर वर ह्यावर व त्याच्या मातापितरांवर मंत्रोक्त अभिषेक* करावा. सुवासिनींनीं त्यावेळीं मंगलदायक आउक्षण त्या तिवर्गास करावें.

इतकें कृत्य झाल्यावर यजमानांनीं उपाध्यायाचें पूजन करून त्याकडून मंडपाकरितां शाखा घ्याव्यात. त्या आंब्याच्या पानांत गुंढाळलेल्या असाव्यात. शाखा कोऱ्या सुपामध्यें मांडून आग्नेयीदिशेपासून विधियुक्त स्थापन‡ कराव्या.

---

§ पुण्याहवाचन मंगलदायक असून आशीर्वादार्थ आहे.

* अभिषेकाहि आशीर्वादार्थ आहे.

‡ मंडपाविषयीं आतां असा प्रचार पडला आहे कीं, मंडप पूर्वीच हवा तसा मर्जीनुरूप घालतात.

मंडपशाखा सुपांत मांडून त्यांची पूजा करावी, कारण त्यांत मंडपदेवतांची स्थापना असते, त्याच सुपामध्यें गौर्यादि मातृकांची पूजा करावी.

इतकें कृत्य झाल्यावर येथें नांदीश्राद्ध † करावें लागतें, श्राद्ध झाल्यावर घरचा आहेर होतो व त्यानंतर शरीरसंबंधिकांकडून व इष्टमित्रांकडून होतो असा प्रकार * आहे. नंतर पूजन झालेला मोद मातेनें व सूप पित्यानें ह्मणजे देवप्रतिष्ठा बसविणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं घेऊन देवघरांत त्याची स्थापना करून तेथें दीप ठेवावा. येथपर्यंत सांगितलेले विधि सर्व देवप्रतिष्ठेंत मोडतात.

## *वाग्निश्चय.

देवप्रतिष्ठा झाल्यावर पुढें वाग्निश्चय विधि

† नांदीश्राद्ध करण्याचें कारण मंगलकार्यांत पितृसंबंध असावा.

* ह्यास शिष्टाचार ह्मणतात.

*हा वाग्निश्चय ग्रंथकार प्रथम लिहून पुढें देवप्रतिष्ठादि कृत्यें लिहितात, परंतु हल्लीं प्रचारांत प्रथम देवप्रतिष्ठा वगैरे व पुढें वाग्निश्चय असें आहे. ह्याचें कारण वाग्निश्चय झाला ह्मणजे प्रतिकूलादि दोष पडतात. ह्याकरितां मध्यें व्यवधान येऊं देत नाहींत त्याप्रमाणें आह्मींहि ह्या ठिकाणींच लिहिला आहे.

करितात. तो असा आहे कीं, वरपित्यानें आपल्या मंडळीसहित वधूपित्याच्या येथें जाऊन प्रथम श्रीगणपतिपूजन करावें. नंतर वरपित्यानें यथाविधि संकल्प करावा. त्या नंतर वधूपित्यानेंहि त्याचप्रमाणें संकल्प करून पांच सुपाऱ्या व पांच हळकुंडें हातीं घेऊन देव, मुनि, विप्र, पितर, कुलदेवता, ह्या पांचांच्या साक्षीनें मी तुम्हास माझी मुलगी देतों असें ह्मणावें. व त्या पांच सुपाऱ्या व हळकुंडें वरपित्याच्या पदरीं बांधावीं. ह्यावेळीं स्मृति ह्मणावी लागते ती अशी.

॥ वाचादत्तामयाकन्या ॥
॥ पुत्रार्थेस्वीकृतात्वया ॥
॥ कन्यावलोकनविधौ ॥
॥ निश्चितस्त्वंसुखीभव ॥ स्मृति.

अर्थ—कन्येचें अवलोकन करण्याविषयीं तू निश्चित ( स्थिर ) झालास ह्मणून मीं वाणीनें तुझ्या पुत्राकरितां कन्या दिली आहे; आणि तूं स्वीकृत केली आहे. आतां तू सुखी (निश्चित) हो.

॥ वाचादत्तात्वयाकन्या ॥
॥ पुत्रार्थेस्वीकृतामया ॥
॥ वरावलोकनविधौ ॥
॥ निश्चितस्त्वंसुखीभव ॥ स्मृति

अर्थ—वराचें अवलोकन करण्याविषयीं तूं स्थिर झालास. आणखी माझ्या पुत्राकरितां वाणीनें तूं कन्या दिली आहे; आणि मीं स्वीकृत केली आहे. आतां तू निश्चित हो.

ह्याप्रमाणें उच्चार करून सुपाऱ्या वधूपित्यास द्याव्या आणि वधूच्या कपाळीं कुंकू लावून चिरडी, चोळी, सोन्याची सरी व मुद्रिका सुवर्ण, रौप्य इत्यादि द्यावें. ओंटी भरून खाऊहि द्यावा. त्यानंतर ब्राह्मणांस दक्षिणा व गृहस्थमंडळीस पानसुपारी द्यावी. ह्याप्रमाणें वाग्निश्चयाचा विधि आहे.

## गौरीहरपूजन.

हा विधि असा आहे कीं, एक आंब्याचें झाड काढून त्याच्या खालीं भूमीवर पाटा ठेवून त्याधर गव्हांचा अगर तांदुळांचा चौक करून त्यावर

हळदीची एक मूर्ति गौरीहराची. ह्मणजे शंकरपार्वतीची मांडावी. लहान लहान मातीचीं बोळकीं चहूंबाजूस चार ठिकाणीं एकावर एक पांचपांच किंवा सातसात मांडून, केळीचा वगैरे मंडप घालावा. सभोंवतीं दीपे प्रज्वलित करून तेथें वधूनें निश्चित मन करून शंकरपार्वतीचें आराधन करीत बसावें. ह्यास गौरीहर § पूजा ह्मणतात.

लग्नतिथीच्या दिवशीं वधूपित्यानें उपोषित असावें, कारण कन्यादान करावयाचें ह्मणून. भोजनोत्तर दान करणें गौण सांगितलें आहे. त्यांतून हें कन्यादान असतें, तेव्हां उपोषित असणें फारच वाजवी होय. इकडे वरगृहीं वरानें आपलें स्नानसंध्यादि नित्यकृत्य आटोपून बसावें.

## रुखवत समारंभ.

वधूपित्याकडील स्त्रीपुरुषांनीं वाजतगाजत वरास फराळाचें न्यावें, त्यास रुखवत असें ह्मणतात. हें फराळाचें साहित्य वरगृहीं समारंभानें

§ गौरीहर पूजेचें कारण इतकेंच कीं, योजिलेला वर निर्विघ्नपणें मिळावा

नेल्यावर तेथें वधूबंधून अगर दुसरा कोणी वडील असल्यास त्यानें प्रथम गणपतीचें पूजन करून मग वराचें पादप्रक्षालन करून गंधाक्षतादिकेंकरून यथाविधि पूजा करावी. वरास शेलापागोटें, पायांतील जोडा इत्यादि आहेर अर्पण करावा आणि पागोट्यास पुष्पांची मुंडावळ बांधून हातीं नारळ द्यावा. नंतर बायकांनीं त्यास आणलेल्या रुखवतांतून फराळास घालून तांबूल द्यावा. काजळ डोळ्यांत घालून गालासहि थोडें ‡ लावावें. इतकें कृत्य झाल्यावर आलेल्या स्त्रियांस वराकडील स्त्रियांनीं हळदीकुंकवादि देऊन ओंट्या भराव्या. मंडळीस पूर्वप्रमाणें पानसुपारी, अत्तरगुलाब देऊन बहुमान करावा. हा रुखवत समारंभ झाला. मग वराची तयारी वधूगृहीं जाण्याची होते.

## वर वधूगृहीं जाण्याचा समारंभ,

वरील सर्व प्रकार झाल्यावर वरानें घरांतील कु-

‡ गालास काजळ लावण्याचा स्त्रियांचा प्रचार आहे, कारण दृष्टि होऊं नये ह्मणून.

ल्स्वामीस; वडिलांस व ब्राह्मणांस नमस्कार करून वडिलांची आज्ञा घ्यावी आणि वधूगृहीं जाण्यास अश्वारूढ व्हावें.

वर घोड्यावर बसला ह्मणजे वधू कडील मंडळीनें त्यास व त्याच्या सर्व आप्तवर्गादि स्त्रीपुरुषांस मोठ्या समारंभानें वाजतगाजत चौऱ्या व अबदागिरीसहित व दारू उडवीत पुष्पवर्षाव व मंत्रघोष करीत आनंदपूर्वक वधूगृहीं मंडपद्वारीं आणावें. तेथें दहींभात व उदकाचा कलश दासी करवी त्यावरून उतरून नंतर मंडपांत घेऊन जावें. असा सांग प्रचार ह्यासमयीं आहे.

## मधुपर्क,

वर मंडपांत आल्यावर सुवासिनींनीं मंगलदायक औक्षण करावें, आणि पुढें मधुपर्क करावा. मधुपर्काचा विधि असा आहे कीं:—वर मंडपांत आल्यावर त्याकडून पोषाक काढवून पादप्रक्षालनादि पूजन वधूपित्यानें करावें. नंतर कांशाच्या वाटींत दहीं, मध व तूप घालून उपाध्यायांनीं व-

यारी केली असते; तें उघडून वरास दाखवावें, व त्याच्या उजव्या हातावर द्यावें. वरानें तें घेऊन त्यांत करंगळीजवळचें बोट व अंगठा तीन वेळ समंत्र प्रदक्षिणेतुल्य फिरवावें. प्रत्येक वेळीं बोटास लागेल तें पूर्वेकडे अगर उत्तरेकडे टाकावें. नंतर बाकी राहिलेलें तीन वेळ समंत्र प्राशन करावें. मधुपर्क एकवेळ प्राशन केला तरी तो उष्टा होत नाहीं, ह्मणून तो पुनः +प्राशन करण्यास हरकत नाहीं.

मधुपर्क झाल्यावर वधूपित्यानें त्यावेळीं "गवालंब" ह्मणजे गोहत्या करावी लागते, परंतु कलींत वर्ज्य असल्यामुळें निष्क्रय गवालंब करितात, ह्मणजे यथाशक्ति द्रव्यास समंत्र स्पर्श करितात.

"गवालंब" झाल्यावर वधूपित्यानें वराच्या कपाळीं गंध लावावें, नंतर समंत्र पितांबर नेसण्यास द्यावा, यज्ञोपवीत समंत्र देऊन धारण करवावें, आचमन करवून मग उत्तरीय वस्त्र (शालजोडी वगैरे)

---

+ प्राशनकरण्यास मधुपर्क उष्टा होत नाहीं ह्यास शास्त्राधार आहे.

करावें, पुष्पमाला घालून मुंडावळी बांधावी, यथाशक्ति अलंकार घावे; धूप, दीप, नैवेद्य, फल, तांबूल, दक्षिणादि यथासांग अर्पण करून त्यावेळीं वधूपित्यानें (वर केवळ लक्ष्मीनारायण समजून) वराचें पूजन करावें, ह्मणजे मधुपर्क विधि झाला.

## पंचभूसंस्कार व अग्निस्थापन,

मधुपर्क झाल्यावर "वेदीवर" ह्मणजे बहुल्यावर आचार्य, वर ह्यांनीं जावें. त्याचा विधि असा आहे कीं, बहुलें पूर्व पश्चिम पांच अगर सात हात व दक्षिण उत्तर चार हात असावें, तें प्रमाण वधूच्या हाताचें असावें. मुहूर्तमार्तंडांत वराच्या हाताचेंहि प्रमाण घेतलें आहे. प्रयोगदर्पणांत आचार्याचीं सहा पावलें घेतलें आहे. आतां हें बहुलें अशक्याच वेळेस घालावें असें शास्त्रांत कोठें आढळत नाहीं, परंतु विवाहसंबंधी कोणत्याहि कार्यास विवाहापूर्वी ३-६-९ हे दिवस वर्ज्य आहेत, ह्मणून तशा दिवसांशिवाय यथाविधि व प्रचाराप्रमाणें केलेलें असतें, त्या वेदीवर प्रथम सांगिल्याप्रमाणें वर

व आचार्यांनीं असून वरानें यथाक्रम संकल्प करावा तो असा कीं:—

॥ (देशकालौस्मृत्वा) धर्मार्थकामप्रजासिद्ध्यर्थंदारपरिग्रहणंकरिष्ये तदंगभूतंअग्निस्थापनमहंकरिष्ये ॥

अर्थः—धर्म, अर्थ, काम, प्रजा सिद्ध होण्याकरितां स्त्री ग्रहण करितों, त्याच्या अंगभूत अग्नि स्थापन करितों. नंतर पंचभूसंस्कार ह्मणजे अग्निस्थापन करावयाचें. त्यास भूमि शुद्ध करावी. ती अशी कीं, प्रथम वेदीवर स्थंडिल सप्रमाण करावें, त्यावर पश्चिमेकडून पूर्वेस दर्भानें समंत्र झाडावें, मग गायीच्या शेणानें समंत्र सारवावें, नंतर समिधेनें पूर्व पश्चिम तीन रेषा समंत्र काढून निघालेली माती करंगळीजवळील हाताच्या बोटानें व अंगठ्यानें उत्तरेस मंत्रेंकरून काढून टाकावी व त्याजवर समंत्र पाणी शिंपडावें, हे पंचभूसंस्कार झाले. नंतर तेथें "लौकिक अग्नि" ह्मणजे घरांतील एका कुमारिकेनें तांब्याच्या ताह्मनांत वर आंब्याचा अ-

गर पंचपल्लवांपैकीं कोणत्याहि पल्लवांनीं आच्छादन करून आणावा. अग्नि सर्वत्र एकच आहे; परंतु कार्या-कार्याच्या ठायीं निरनिराळीं त्यास नांवें आहेत, ह्मणून मनुष्याच्या अखेरच्या संस्कारवेळचें नांव "क्रव्याद" असें आहे, त्यास तो अमंगल ह्मणून त्यांतील अंश समंत्र काढून टाकावा व बाकी समंत्र स्थापन करावा त्यास ह्या ठिकाणीं "योजक" असें नांव आहे. तो स्थापन झालेला अग्नि कार्य समाप्तीपर्यंत विझूं नये ह्मणून लांकूड अगर शुभा त्यास लावून ठेवाव्या.

## लग्नसमारंभ,

वरील सर्व प्रकारा नंतर वधू गौरीहराजवळ प्रार्थना करीत बसली असते तेथून तीस मध्यघरांत आणून तांदुळाचे राशि केलेल्या पाटावर पूर्वाभिमुख करून उभी करावी, व मध्ये अंतरपाट यथाविधि धरावा, व दुसऱ्या बाजूस ह्मणजे वधूच्या समोर वधू दृष्टीस न पडे अशा रीतीनें वरास आणून पश्चिमाभिमुख उभें करावें, व तेथें ज्योतिषी वगैरे

ब्राह्मणांनीं धरलेला इष्टकाल होईपर्यंत "मंगलाष्ट-कें" ह्मणावीं. त्यासमयीं वधूच्या मामानें अगर तदभावीं जो कोणी असेल त्यानें वधूच्या मागें उभें रहावें. त्याचें कारण मातुळांनीं देवाची आराधना करण्याकरितां आहे; व तीं मंगल अष्टकें ह्मणते समयीं दरएक स्तुति संपतांच उभय पक्षांकडील स्त्रीपुरुषांनीं अक्षता वधूवरांवर टाकीत असावें. इकडे जोशीबुवांनीं घटिका यथाविधि घालून इष्टकाल साधित बसलें असावें. इष्टकाल आला ह्मणजे अंतरपाट काढून "सावधान ‡" असा ध्वनि करून टाळी वाजवावी; व वधूनें वराच्या गळयांत पुष्पांची माळ घालावी, अगर वराच्या मस्तकावर अक्षता टाकाव्या (जनरूढि आहे कीं, सर्वांनीं टाळी वाजवावी). ह्या प्रकारें "सावधान" झालें ह्मणजे आनंदपूर्वक वाद्यघोष मंडपांत करावा. समारंभास आलेल्या गृहस्थांस पानसुपारी, अत्तरगुलाव, हारगजरे, तुरे इत्यादि देऊन बहुमान करावा.

‡ हा वधूवरांस बजावणी आहे कीं, तुह्मी उभयतांचें लग्न लागतें सावध व्हा.

ना. ध. ८४

( काहीं लोकांत ह्या वेळीं सर्व स्त्रीपुरुषांस नारळ देण्याची चाल आहे. कोठें अखंडसुपाऱ्या देण्याची चाल आहे ). आचार्य, उपाध्याय, व वैदिक शास्त्री ब्राह्मणांस "देकार" दक्षिणा द्यावी. सर्व सुवासिनी स्त्रीयांस हळदीकुंकू देऊन ओट्या भराव्या, असा प्रचार लग्नसमयीं असून तो सांग झाला ह्मणजे लग्न झालें, असें मानितात. ( वर लिहिलें इतकें कृत्य झालें ह्मणजे सांग लग्नविधि झाला असें समजून कांहीं लोक घरोघर चालते होतात; परंतु इतकें झालें ह्मणजे लग्नविधि पूर्ण झाला असें शास्त्रानुमतें नाहीं. कारणपरत्वें ह्यापुढें हि लग्न फिरतें असें शास्त्रमत आहे.

माळ घातल्यानंतर व अक्षता टाकिल्यानंतर वैदिक वगैरे आचार्य ब्राह्मणांनीं आशीर्वादार्थ श्रुतींतील "मनोजूतिरि"त्मिमंत्रेंकरून प्रतिष्ठा करावी ह्मणजे तेणेंकरून उभयतांमध्यें अविच्छिन्न प्रीति राहील असा आशीर्वाद होतो.

वरील प्रकार झाल्यावर वराच्या ठिकाणीं वधूस

आणि वधूच्या ठिकाणीं वरास § बसवावें. नंतर वधूस नेसण्याकरितां वस्त्र "पीतांवर द्यावें". हे तेस-मयीं मंत्र ह्मणावा तोः—

॥ जरांगच्छपरिधत्स्ववासोभवा कृष्टीनामभिशस्तिपावा शतंवजी वशरदःसुवर्चारयिंचपुत्राननुसंव्य यस्वायुष्मतीदंपरिधत्स्ववासः ॥ श्रुति

अर्थः—माझ्या बरोबर वृद्ध हो; मी संपादन केलेलें वस्त्र नेस. मनुष्यांमध्यें निंदेपासून रक्षण करणारी हो; शंभर वर्षें वांच. पतिव्रतेचें जें तेज तें पावून द्रव्य, पुत्र उत्पन्न करून सुख पाव; हें वस्त्र परिधान कर.

असें ह्मणून वस्त्र द्यावें, तें तिनें नेसावें. नंतर उत्तरीय वस्त्र (समंत्र फडकी) द्यावें. ते तिनें पांघरावें. नंतर वधूपित्यानें वरास व वधूस एक-

§ असें करण्याचें कारण असें आहे कीः— वरास कन्यादान घेणें आहे. दान घेणारा उत्तराभिमुख असावा; परंतु कन्यादान घेणारा पूर्वाभिमुख असावा. कन्यादान देणारा उत्तराभिमुख असावा. ह्यास शास्त्राधार आहे.

मेकांस पाहण्यास सांगावें. त्याप्रमाणें वधूवरांनीं एकमेकांस पाहवें. ह्या समयीं वरानें मंत्र ह्मणावा तो:—

॥ समंजंतुविश्वेदेवाःसमापोत्हृदयानिनौ संमातरिश्वासंधातासमुदेष्ट्रिदधातुनौ ॥ श्रुति.

अर्थः—सर्व देव व उदक आपलीं उभयतांचीं मनें किंवा मनाचे धर्म संकल्पादिक जे आहेत त्याते अत्यंत गुण देऊन संस्कारयुक्त करो. अनुकूल वायु व अनुकूल ब्रह्मदेव जो तो धर्मादिक उपदेश करणारी देवता आपल्या ह्दयास मिळवून देवो.

वधूच्या गळ्यांत वरानें मंत्रेंकरून मंगलसूत्र बांधावें. नंतर उभय पक्षांच्या आचार्यांनीं कच्चें सूत सप्रमाण घेऊन दुहेरी करून यथाविधि वरास व वधूस वेष्टन + करावें.

---

+ ह्यांत ब्राह्मणांनीं वधूवरांस कच्चयां सुतानीं एका ठिकाणीं बांधलें असें होतें.

## कन्यादान.

वधूपित्यास कन्यादान करणें आहे ह्मणून त्यानें संकल्प करावा तो असाः—

॥ अस्मिन्पुण्याहे अस्याः मम कन्यकायाः अनेन वरेण धर्मप्रजया उभयोर्वंश वृध्द्यर्थं तथाच मम समस्तपितॄणां निरतिशयानंदब्रह्मलोकावाप्त्यादि कन्यादानकल्पोक्तफलावाप्तये अनेन वरेण अस्यां कन्यकायां उत्पादयिष्यमाणसन्तत्या दशपूर्वान् दशापरान् मांच एकविंशतिपुरुषान् उद्धर्तुं ब्राह्मविवाहविधिना श्रीलक्ष्मीनारायणप्रीयते कन्यादानमहं करिष्ये ॥

अर्थः—या पुण्य दिवसाच्या ठायीं ही माझी कन्या आहे तिला ह्या वरेंकडून धर्मानें उत्पन्न होणाऱ्या प्रजेंकरून उभयतांच्या वंशवृद्धीकारितां व माझे संपूर्ण पितर जे आहेत त्यांस अत्यंत आनंदब्रह्म-

लोकप्राप्ति आणि कन्यादानापासून जें फळ प्राप्त होणार त्याकरितां ह्या वराच्या योगेंकरून ह्या कन्येच्या ठायीं होणारी जी संतति तिनेंकरून पूर्वीचे दहा पुरुष व दहा नंतरचे व मी, असे एकवीस पुरुषांचा उद्धार होण्याकरितां ब्राह्मविवाहविधीकरून श्रीलक्ष्मीनारायणप्रीतीकरितां मी कन्यादान करितों

नंतर कन्या वरास दान देणें, ती आपल्या कुळाची त्रयी ( ह्मणजे तीन पुरुषांचीं नांवें ) सगोत्र घेऊन वराकडीलहि तशींच उच्चार करून पुढें असें ह्मणावयाचें कीं, " तुह्मी अमुक तुह्मांस अमकयाच्या कुलांतील ही कन्या यथाशक्ति सालंकृता दिली." ) व वराकडील त्रयी उच्चारून वधूपित्यानें हातांत दर्भ व उदक घेऊन कन्येचा उजवा हात वराच्या उजव्या हातावर देऊन उदक सोडावें. वरानें कन्या घेतेवेळीं ह्मणावें तें असें:--

॥ द्यौस्त्वा ददातु पृथ्वी त्वा प्रतिगृण्हातु ॥ श्रुति

अर्थः—आकाश तूतें देवो, पृथ्वी तूतें ग्रहण करो, व दानानिमित्त वरास दक्षिणा यथाशक्ति द्यावी.

नंतर वरानें ह्मणावें:— " **स्वस्ति** " अर्थ बरें.

नंतर वधूपित्यानें ह्मणावें:—

॥ यस्त्वयाधर्मश्चारितव्यःसोनयासह ।
धर्मेचअर्थेचकामेचत्वयेयंनातिचारि-
तव्या ॥ श्रुतिं

अर्थः—जो धर्म तूं आचरण करावा, तो इच्यासीं सह आचरण करावा. धर्माविषयीं, अर्थाविषयीं, व कामाविषयीं तू ही कन्या नं त्यागावी.

नंतर वरानें ह्मणावें:—॥ नातिचरामि ॥ "श्रुति"

अर्थः—त्याग नाहीं करणार.

## सुवर्णाभिषेक.

नंतर "सुवर्णअभिषेक" करावा जो असा कीं, वराच्या हातावर वधूचा हात मागें वधू पित्यानें दिलाच आहे त्याजवर हा अभिषेक करावा; तो "सर्वःब्राह्मण" जो प्रयोग आहे त्याच्या मंत्रानें उपाध्यायांनीं वगैरे पठण करून करावा. ह्यास सुवर्णाभिषेक ह्मणण्याचें कारण सुवर्ण उदकांत पालूनें करावा लागतो; ह्मणून त्यास सुवर्णअभिषेक

ह्मटलें आहे. हा करण्याचें कारण आशीर्वादार्थ आहे.

नंतर वधूपित्यानें वधूची स्तुति करावी ती अशी:—

॥ कन्येममाग्रतोभूयाःकन्येमेदेवि पार्श्वयोः कन्येमेपृष्ठतोभूयास्त्वद्दानान्मोक्षमाप्नुयाम् ॥ स्मृति.

अर्थ—हे कन्ये, माझ्या अग्रभागीं तू हो. हे कन्ये देवि, माझ्या दोही बाजूस हो; हे कन्ये, माझ्या पृष्ठभागीं हो; तुझ्या दानेंकरून मी मोक्षातें प्राप्त होईन.

नंतर वराची स्तुति करावी ती अशीं कीं,

॥ कन्यांलक्षणसंपन्नांकनकाभरणैर्युतां दास्यामिब्रह्मणेतुभ्यंब्रह्मलोकजिगीषया ॥ १ ॥ पृथिव्यादिमहत्भूताःसाक्षिणःसर्वदेवताः इमां कन्यांप्रदास्यामिपितृणांतारणाय

च ॥ २ ॥ ममवंशकुलेजाताअष्टव र्षाणिपोषिता तवविप्रमयादत्तापु त्रपौत्रप्रवर्द्धिनी ॥ ३ ॥ गौरींकन्या मिमांविप्रयथाशक्तिविभूषितां गो त्रायशर्मणेतुभ्यंदत्तांविप्रसमाश्रय ॥ ४ ॥

अर्थः—उत्तम लक्षणेंकरून युक्त आणि सुवर्णालंकारेंकरून युक्त अशी जी कन्या तीते हे ब्राह्मणा, मजला ब्रह्मलोक प्राप्त व्हावा ह्मणून तुजकारणे देतों. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश व सर्व देवता ह्यांच्या साक्षीनिशीं ही कन्या पितरांच्या उद्धाराकरितां तुजकारणें देतों. ही कन्या माझ्या वंशामध्यें उत्पन्न झाली आहे, आठ वर्षेंपर्यंत मीं हिचें पालन केलें आहे; हिच्यापासून पुत्रपौत्रादि वृद्धि होणारी आहे, हे विप्रा, मीं तुला दिली. ही यथाशक्ति अलंकारयुक्त आहे ती अमुक गोत्र व नांवाचा जो तू तुजकारणें दिली तुवा घ्यावी.

---

*अष्टवर्षाणिपोषिता या मंत्रात जितक्या वर्षाची कन्या असेल तितक्या वर्षाचा ऊह करावा जसें—सप्तवर्षाणि, दशवर्षाणि, तसा अर्थांत समजावा.

नंतर वरानें ह्मणावें ॐआश्रयामि [illegible] प्रेतों.

असें ह्मणून वरानें व वधूनें हात वेगळे करावे, नंतर वधूपित्यानें वरास लक्ष्मीनारायण समजून नमस्कार करावा व वराच्या व वधूच्या हातांत लग्न कंकण बांधावयाचें त्याजबद्दल यथाविधि गणपतिपूजन वगैरे करून संकल्प करावा, व श्रीगणपतीस दाखविलेला नैवेद्य अगर दुसरें कांहीं वधूवरांस एकमेकांचें उष्टें एकमेकांस कोठें कोठें खाऊं घालितात. कंकण बांधणें व उच्छिष्ट परस्परांचें परस्परांस खाविविणें हें प्रीति होण्याकरितां व वाढण्याकरितां आहे. ब्राह्मणांनीं वधूवरांस कच्या सुतानें एकेठिकाणीं बांधलें ह्मणून वर सांगितलें आहे, तें सूत यथाविधि काढून व कंकण करून प्रथम वधूच्या हातांत बांधावें व दुसरें वराच्या हातांत मागून बांधावें, नंतर वधूपित्यानें उभयता वधूवरांस हातीं धरून उपाध्यायासह वेदीवर ह्मणजे बहुल्यासमीप यावें आणि "सोम, रवि आणि अग्नि ह्यांचें सूत्रांत" सहा श्लोकांनीं स्तवन सांगितलें आहे तें स्तवन वरानें करून उजवा पाय वे-

दीदर ठेवून वधूपित्यानें वधू, वर, व उपाध्याय ह्यांजसहित वर चढावें आणि पूर्वीं अग्नि स्थापन केला आहे त्यास प्रदक्षिणा वरानें करून अग्नीच्या पश्चिम बाजूस बसवावें. वधूस उजव्या बाजूस घ्यावें, तें एका आसनावर बसावें आणि होम करावा.

## होम.

"अन्वाधान" ह्मणजे पुढें ज्या देवतेचें हवन करणें त्या देवतेचें स्मरण करणें, हें "अन्वाधान" माध्यंदिनशाखेस स्मार्त कर्माविषयीं केलें तरी योग्य, न केलें तरी चालेल अशाविषयीं प्रमाण आहे तें असें कीं:—

॥नान्वाधानंतथागृह्येयजुषांवैप्रकीर्तितं श्रौतकर्मणिसर्वत्रअन्वाधानंविधीयते॥ इतिदर्पणे.

अर्थः—यजुर्वेदी जे त्यांस गृह्य कर्माविषयीं अन्वाधान नको, श्रौत कर्माविषयीं सर्वत्र अन्वाधान

वाचन. ०४

तू ऋक् म्ह० ऋचा आहेस, मी आकाश आहें; तू पृथ्वी आहेस,॥२॥ हे कन्ये, ये आपण दोघे बरोबर विवाह करूं, दोघे मिळून रेतातें धारण करूं, प्रजेते उत्पन्न करूं, पुष्कळ पुत्रांते पावूं॥३॥ ते पुत्रहि वृद्ध होवोत, आपणहि परस्पर प्रेमयुक्त होवूं. कांतिमान शोभायमान होवूं, आपण पुत्रांसहित शंभर वर्षे पाहूं. शंभर वर्षे वांचूं म्ह० निरुपद्रव प्राण धारण करूं. शंभर वर्षेपर्यंत शद्वांतें ऐकूं॥४॥

नंतर वरानें वधूस अश्मारोहण करवावें ह्मणजे एका दगडावर उभें करावें व ह्मणावें तें असें कीं:—

॥ आरोहेममश्मानमश्मेवत्वर्ट् स्थिराभव अभितिष्ठपृतन्यतोवबाधस्व पृतनायतः ॥ श्रुति.

अर्थः—ह्या दगडातें आरोहण कर. तेणेंकरून तू दगडाप्रमाणें दृढांगी हो, आणि कलह करणाऱ्या व सेना घेऊन येणाऱ्या शत्रूंते अधोभागीं करून बाधा कर.

नंतर "गाथा" ह्मणून श्रुतींतील मंत्र आहेत

ते वरानें यथाविधि गायन करावे. नंतर मागें सांगितल्या प्रमाणें वधूवंधूनें वधूच्या अंजलींत यथाविधि पुनः लाह्या घालाव्या, त्याच्या प्रथम प्रमाणें तीन आहुति देऊन सदरीं गाथा मंत्रपर्यंत विधि करावा. ह्या प्रमाणें एकंदर तीनवेळ करावें. नंतर वधूनें अग्नीस प्रदक्षिणा करून उभें राहून अंजालि करावी. त्यांत वधूवंधूनें सुपांत शिलक राहिलेल्या लाह्या शमीपत्रासहित मध्यभागानें तिच्या अंजलींत द्याव्या व तिनें ती आहुति यथाविधि भगदेवतेप्रीत्यर्थ अग्नींत द्यावी. मग चौथ्यानें प्रदक्षिणा करून "प्रजापति" देवतेप्रीत्यर्थ तुपाची द्यावी.

## सप्तपदी.

"सप्तपदी" ह्मणजे वधूनें वराजवळ देव, द्विज, अग्नीच्या साक्षीनें सात प्रतिज्ञा कराव्या लागतात त्यांचा विधि असा कीं, तांदुळांचे लहान *सात ढीग वंहुल्यावर करून त्यांजवर सुपाऱ्या मांडून त्यांची यथाविधि पूजा करून प्रतिज्ञा कराव्या त्या येणेंप्रमाणें.

* त्या ढिगासच पर्वत, गिरि, अचल ह्मणतात.

॥लब्धस्त्वंचमयाभर्ताप्राक्तनैःसुकृतैः कृतैः देवाग्निसन्निधौविप्रैर्मह्यंसंपादितोह्यसि ॥ मुक्तावली.

अर्थ मला पूर्वजन्मींच्या पुण्यानें तू भर्ता मिळालास व ब्राह्मणांनी देव, अग्नि ह्यांच्या सन्निध संपादन करून दिला.

॥ सुखदुःखानिसर्वाणिभोक्ष्येहंचत्वयासह यत्रत्वंतत्रचैवाहंकन्याचैकपदेब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थः—मी तुझ्या बरोबर सुखदुःख भोगीन, जेथें तू तेथें मी राहीन. एक गिरि उल्लघंन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥ एकमिषेविष्णुस्त्वानयतु ॥

अर्थः—हे प्रिये तू एक पदी हो. [illegible]नी तू मला अनुकूल हो. ह्मणजे बहुत पुत्रांस प्राप्त होऊं, ते जरदष्टि असोत. नंतर वधूनें ह्मणावें.

॥ कुटुंबंपालयिष्यामित्वद्बुध्याजीवि

तावधि अस्तिनास्तिचसंतुष्टाद्दितीये सापदेऽब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थ—मी जिवंत आहें तोंपर्यंत तूं सांगशील त्याप्रमाणें कुटुंबाचें पालन करीन. घरामध्यें कांहीं असो वा नसो संतुष्ट राहीन. दुसरा गिरि उल्लंघन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥ द्वेऊर्जेविष्णुस्त्वानयतु ॥

अर्थः—प्रजोत्पादनशक्तीसाठीं द्विपदी हो. नंतर वधूनें ह्मणावें.

॥ तवभक्तिपरानित्यंसदैवप्रियवादिनी भविष्यामिपदेचैवतृतीयेसाब्रवीदिदं ॥ मुक्तावली.

अर्थः—मी नित्य तुझ्या भक्तीमध्यें तत्पर राहीन. सर्वकाळ तुझ्याशीं मधुर भाषण करीत जाईन. तिसरा गिरि उल्लंघन करावा नंतर वरानें ह्मणवावें तें.

॥त्रीणिरायस्पोषाय विष्णुस्त्वानयतु॥

अर्थः—धनाच्या पुष्टीस्तव तूं त्रिपदी हो. नंतर वधूनें ह्मणावें.

॥त्वत्सुखेसुखसंयुक्तात्वद्दुःखेदुःखितां गता त्वद्विपत्तिंगमिष्यामिकन्यातुर्यपदेब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थः-- तुला जर सुख प्राप्त होईल तर मी सुख भोगीन. तुला जर दुखः प्राप्त होईल तर मी दुःख भोगीन. तुला जर विपत्ति प्राप्त होईल तर त्या विपत्तीला मी पुढें होईन. चौथा गिरि उल्लंघन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥चत्वारिमायोभवायविष्णुस्त्वानयतु॥

अर्थः --लक्ष्मीच्या संरक्षणा कारणें तू चतुष्पदी हो. नंतर वधूनें ह्मणावें.

॥ ऋतुकालेशुचिःस्नाताक्रीडयामि त्वयासह नाहंपरनरंगच्छेपंचमेसापदेब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थ--ऋतुकालीं शुचि, स्नात होऊन तुह्माशींच रममाण होईन. पर पुरुषाप्रत गमन करणार नाहीं. पांचवा गिरि उल्लंघन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥ पंचपशुभ्योविष्णुस्त्वानयतु ॥

अर्थ—संततीकरितां तू पंचपदी हो. नंतर वधूनें ह्मणावें.

॥ इहार्थेसाक्षिणोविष्णुरग्निरीशोद्विजस्तथा उभयोःप्रीतिसंभूताकन्यापष्ठेपदेब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थ—दोघांचा जो संबंध झाला त्याविषयीं विष्णु, अग्नि, शंकर आणि ब्राह्मण हे साक्षी आहेत असें प्रीतियुक्त कन्या बोलली. सहावा गिरि उल्लंघन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥ षड्ऋतुभ्योविष्णुस्त्वानयतु ॥

अर्थ—तू ऋतूसाठीं षड्पदी हो. नंतर वधूनें ह्मणावें.

॥होमयज्ञादिकार्येषुभविष्यामिसहायिनी धर्मार्थकाममोक्षाणांसप्तमेसापदेब्रवीत् ॥ मुक्तावली.

अर्थ—यज्ञकर्माविषयीं आणि धर्मार्थकाममोक्षां-

विषयीं मी साहाय्य करीन. सातवा गिरि उल्लंघन करावा. नंतर वरानें ह्मणावें.

॥ सखेसप्तपदाभवसामामनुव्रताभव विष्णुस्त्वानयतु ॥

अर्थ—सख्यत्वास्तव तू सप्तपदी हो.

ही सप्तपदी झाल्यावर येथून लग्न फिरणें नाहीं. नंतर वधूच्या मस्तकावर वरानें यथाविधि अभिषेक करावा. व दिवसास विधि झाला असेल तर वरानें सूर्याचें, अगर सूर्यास्तानंतर असेल तर ध्रुवाचें दर्शन घेण्यास वधूस आज्ञा करावी; दृष्टीस पडण्यासारखें नसेल तर दर्शन घेतलें ह्मणून ह्मणावें, ह्मणजे स्मरण करावें. नंतर वरानें वधूच्या खांद्यावरून उरापर्यंत हात आणून ठेवावा, ह्मणजे गळ्यांत हात घालावा व खालीं लिहिलेला मंत्र ह्मणावा.

॥ममव्रतेतेहृदयंदधामिममचित्तमनुचित्तंतेअस्तु ममवाचमेकमनाजुषस्वप्रजापतिस्त्वानियुनक्तुमह्यं अथैनाम

भिमंत्रयतेसुमंगलीरियंवधूरिमार्ट्स
मेतपश्यत सौभाग्यमस्यैदत्वायाथा
स्तंविपरेतन ॥ श्रुति.

अर्थः—ब्रह्मदेव जो तो माझ्या व्रताच्या ठायीं तुझ्या मनातें धारण करो, माझ्या चित्ताला अनुकूल तुझें चित्त असो; तूं एक ठिकाणीं मन ठेवून माझ्या वचनातें ऐक, तोच ब्रह्मदेव मजकारणें तूंतें योजो. ह्या नंतर वर वधूते अभिमंत्रण करितो. हे विवाहदेवताहो, ही वधू मंगलरूप असो. इजप्रत येऊन भेटा व चांगल्या दृष्टीनें पहा; इजकारणें सौभाग्यातें देऊन गृहाप्रत जा, विमुख जाऊं नका. नंतर वधूच्या कपाळीं वरानें कुंकू लावून मस्तकावर हात ठेवून यथाविधि आशीर्वाद द्यावा. नंतर एक अवदान तुपाचें करावें. त्यास "स्विष्टकृत्" असें ह्मटलें आहे, तसेंच मागें "आसादनी" ह्या विधीमध्यें उपाध्यायाची योजना ब्रह्मा ह्मणून करावी लागते. त्यानें आसादनीविधीमध्यें स्थापन केलेला कलश थोडा उपडा करून त्यांतील

उदकानें वधूवरांवर यथाविधि अभिषेक करावा व त्यास वरानें 'पूर्णपात्र' ह्मणजे तांब्याच्या ताम्हनांत अगर तदभावीं यथाशक्ति पात्रावर अगर पानाच्या द्रोणांत तांदुळ घालून सदक्षिण द्यावें. नंतर वधूवंधूनें अगर तदभावीं कोणी असेल त्यानें वराच्या उजव्या कानास हात लावावा. वरानें त्यास पागोटें द्यावें. ह्यास कानपिळ्याचें पागोटें असें म्हटलें आहे. हा प्रचार आहे. वधूवरांनीं एक संवत्सर म्हणजे वर्षपर्यंत शुचिर्भूत असावें. निदान तीन दिवस तरी असावें. व क्षार मिश्रित म्हणजे खारट वगैरे पदार्थ तीन दिवस तरी निदान खाऊं नये. एके पात्रांत उभयतांनीं भोजन‡ करावें. नंतर 'देकार' म्हणजे ब्राम्हणांस दक्षिणा यथाशक्ति द्यावी. परंतु हा दक्षिणेचा प्रकार पूर्वींच होण्याचा पाठ आहे. कोठें कोठें लग्नसोहळा समाप्त झाल्या नंतर सभा करून दक्षिणा देण्याचा पाठ आहे. विवाहवेदीजवळ वैदिक वगैरे आचार्य असतील त्यांस

‡ पंक्तीमध्यें जोड्यानें बसवितात, ह्याचें कारण हेंच असावें.

दक्षिणा द्यावी. येथें विवाह होम समाप्त झाला.

## आंबाशिंपणें.

नंतर आंबाशिंपणें हें कोठेंकोठें सुनमुख झाल्यावरहि करितात. तें असें कीं, उभयतां वधूवरांनीं पूर्वीं गौरिहर स्थापन झालेला आहे त्या ठिकाणीं जाऊन आंबा ह्मणून गाणें आहे तें सुवासिनींनीं ह्मणत असून कालवलेलें कुंकू एका वाटींत घेऊन वरानें हातांत एक पान घेऊन त्या पानानें गौरिहरावर शिंपडावें. हें सौभाग्यदायक आहे.

## सुनमुख.

वरमातेनें आपल्या पुत्रानें मिळविलेल्या बायकोचें ह्मणजे सुनेचें मुख पाहणें ह्यास सुनमुख पहाणें असें ह्मटलें आहे. लग्न समारंभास प्रारंभ झाल्यापासून वरमाता वधूकडील मंडपांत हा काल पर्यंत येणें नाहीं. लग्न लागल्यांवर ह्मणजे विवाहहोम संपल्यावर वधूमातेनें तीस समारंभानें वाजंतगाजत सन्मानानें आणिल्यावर तिनें येऊन मु-

लीच्या कपाळीं कुंकू लावून तिच्या अंगावर सर्व डागिने घालावे. वेळ नसल्यास गळ्यांत पुतळ्यांची अगर कारल्यांची अगर हरपररेवड्यांची अगर कशाची तसी सुवर्ण भूषणाची माळ घालून मांडीवर घेऊन तोंडांत साखर घालावी. ह्मणजे. तोंड गोड करावें. मुलीनें वरमातेस ह्मणजे आपल्या सासूस नमस्कार करून पांच वायनें द्यावीं. व वरमातेची वधूमातेनें यथाशक्ति अहेर करून ओंटी भरावी. ह्मणजे सुनमुख झालें.

## भोजनप्रकार.

ह्याचें मूळ असें आहे कीं, कन्यादाना बद्दल ब्राह्मणभोजन वधूपित्यानें यथाशक्ति करावें. परंतु प्रचारांत असें आहे कीं, प्रथम दिवशीं ह्मणजे लग्न लागल्या दिवशीं वराकडील इष्ट व शरीरसंबंधिक बायका पुरुषांसहित भोजनाचा समारंभ होतो. व वराकडे वधूपित्याकडून आमंत्रण बायकापुरुषांचें जातें, त्याप्रमाणें ते येऊन भोजन करितात; त्यासमयीं वरास व वधूस एके ताटांत बसवितात.

भोजनसमयीं वराच्या हातावर तुपाची आपोष्णी वराच्या सासूनें अगर तद्भावीं असेल तिनें घालावी असा आधार आहे. वराकडून वधूस व वधूकडून वरास परस्परांचीं नांवें घेववून घांस देववितात, वाजंत्री वाजवितात, अशा थाटानें पुरुषांचीं जेवणें झालीं ह्मणजे त्याचप्रमाणें बायकांचीं जेवणें होतात. तेथें विनोदपर उभयपक्षीं करवल्यांचे उखाणे होतात, त्यांत एकमेकींचे व एकमेकांस लावून उभयपक्षांचीं वर्में कर्में काढण्याची चाल आहे ती फार अप्रशस्त आहे; कारण त्यामुळें मंगल कार्यांत तंटे व रुसवे उत्पन्न होतात. त्या दिवशींचे अशा रीतीनें प्रकार आटोपल्यानंतर त्याच दिवशीं ऐरिणीप्रदान ह्मणजे झाल देण्याचा मुहूर्त योजिला असेल तर ऐरिणीप्रदानाचा विधि पुढें सांगितल्याप्रमाणें करून वधूप्रवेश ह्मणजे वधूस वरासहित वरगृहीं आणावी; व मुहूर्त ते दिवशींच योजिला नसेल तर वरानें वधूगृहीं रहावें आणि दुसरे दिवशीं प्रातःकाळीं निजून उठल्यावर मुखमार्जन वगैरे विधि आटोपल्यावर वरमातेकडे तोंड धुवावयाचें पाणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

व विनोदपर कांहीं उच्छिष्ट अन्न ज्यास आमंत्रण ह्मणतात तसें देऊन वाजत गाजत वराकडील करवल्यांस बोलावणें व वरपिता माता आदिकरून इष्टमित्र शरीरसंबंधिक वगैरेंस आमंत्रणें ज्यास अ-क्षत असें ह्मणतात, तीं देण्यास कांहीं बायका व कांहीं पुरुष असे वधूपित्याकडून वरगृहीं जातात. तेथें पुरुषांनीं पुरुषांस व बायकांनीं बायकांस आ-मंत्रणें देऊन यथाप्रचारें वरमातेस चवरंगावर बस-वून पाय धुऊन हळदकुंकूं देऊन ओंटी भरतात व मग परस्पर बायकांस हळदकुंकूं देऊन ओंट्या भरतात. पानसुपारी अत्तरगुलाब देऊन आमंत्रणें देऊन वराकडील करवल्यांसहित गेलेली मंडळी परत येते; तों इकडे वर रुसून बसत असतो त्यास अंगठी अगर धोतरजोडा किंवा दुसरें कांहीं शक्त्यनुसार देऊन वराची समजूत करून आणि-त्यानंतर वर व वधूकडून हळद खेळवणें, सुपाऱ्या लपवणें, विड्या तोडाविणें वगैरे खेळ झाल्यावर उ-भयतांस मांगलिक स्नान घालितात. तेथेंहि कांहीं खेळ होतात. नंतर वर व वधूसहित उभ-

तांच्या करवल्यांसहित प्रातःकाळचें भोजन होतें. ह्यास करवल्यांचें भोजन असें ह्मणतात. तें झाल्यावर शिष्ट पंक्तिची सिद्धता होऊन प्रथम दिवशीच्या थाटाप्रमाणें स्त्रीपुरुषांचीं भोजनें होतात. असे प्रकार झाल व वधूप्रवेश ह्यांस मुहूर्त असेल तेथपर्यंत होऊन नंतर 'ऐरिणीप्रदान करावें' तें लग्नदिवसापासून तिसरा दिवस शिवाय करून मुहूर्तावर करावें.

## ऐरिणीप्रदान म्हणजे झाल.

हीं झाल वेळूंची केलेली चांगली मोठी असावी. ती वेळूंची करण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांस वंश असें ह्मटलें आहे, व हा प्रयोगहि वंशवृद्धीचा आहे म्हणून ती झाल वंशांची करावी लागते. त्यांत कणकीचे हळद घालून केलेले पिंवळे दिवे एक मोठा व त्याचे भोंवतालीं पंधरा लहान असे असून सवस्त्र पक्वान्नासहित फळतांबूल दक्षिणा व सोळा सुपल्या व अकरा कलश सुवर्ण परिपूर्ण असे असावे. अशी यथाविधि सि-

च्छता करून वधूमातापित्यांनीं शुचिर्भूत होऊन झा-
लीसन्निध येऊन बसावें. व तेथें वधू व वर ह्यांस
यथाविधि बसवावें नंतर वधूपित्यानें झालींत तीन
तांदुळांचे ढीग करून त्यांवर तीन सुपाऱ्या ठेवा-
व्या व त्यांचें यथाविधि पूजन करून ऐरिणीचीहि
यथाविधि पूजा करावी, नंतर वराच्या आचार्याची
पूजा करून यथाशक्ति दक्षिणा देऊन ऐरिणीची प्रा-
र्थना यथाविधि करावी, नंतर वरमातेची पूजा क-
रावी व आहेर करून ऐरिणीदान यथाविधि द्यावें.
नंतर वराची पूजा व आहेर करून मळवट भरून,
वधूवरांस मुंडावळी बांधून त्यांच्या मस्तकीं ती झा-
ल लावून वरपिता व त्याच्या गोत्रजांची पूजा करू-
न यथाशक्ति आहेर देऊन यथाविधि त्यांच्या मस्त-
कीं अनुक्रमें ठेवावी. असें झाल्यावर ती झाल वराक-
डील मनुष्यांनीं सांभाळावी. नंतर वधूमातापित्यांनीं.
वधूस वरपित्याच्या मांडीवर बसवून असें ह्मणावें:—

**॥अष्टवर्षाइयंकन्यापुत्रवत्पालितामया॥***

---

* ह्याविषयीं विचार पूर्वीं लिहिलाच आहे.

॥इदानींतवपुत्रायदत्तास्नेहेनपाल्यतां॥

अर्थः—आठवर्षेंपर्यंत ह्या कन्येचें मीं पुत्रवत् पालन केलें, आतां तुमच्या पुत्रास दिली, तर स्नेहेंकरून पालन करावें. असें ह्मटल्या नंतर वरपित्यानें वधूच्या मुखांत साखर घालावी ह्मणजे सदरील वधूपित्याच्या म्हणण्यास रुकार दिला असें होतें. नंतर त्याच प्रमाणें वरमातेच्या मांडीवर देऊन असें म्हणावें:—

॥अस्मदादिसुहृद्वंधून्त्यक्त्वायातिभवद्
गृहंअतिस्नेहेनवैमातःकंन्यांमेपरिपालय॥

अर्थः—मी व माझे आप्तवर्ग ह्यांचा त्याग करून तुमच्या घरीं माझी कन्या येते. हे माते, माझ्या कन्येप्रत अतिस्नेहेंकरून पालन कर.

असें ह्मटल्यावर वरमातेनें वधूच्या तोंडांत साखर घालावी. नंतर वधूस वराच्या मांडीवर द्यावी त्यावेळेस वधूपित्यानें असें ह्मणावें:—

॥ इयंकन्यामयादत्तातवविप्रसहायिनी
स्वदेशेपरदेशेवापरिपाल्याकुलोचितं ॥

अर्थः—हे ब्राह्मणा, मीं माझी कन्या तुजकारणे तुझ्या साहाय्यार्थ दिली, तर देशीं परदेशीं तुझ्या कुलास उचित असेल त्याप्रमाणें पालन कर. नंतर वधूनें वशिष्ठ अरुंधतींची, सुपाऱ्या मांडून पूजा करावी ती सौभाग्यवृद्धीकरितां आहे. व आठ खोवऱ्याच्या वाट्या घेऊन त्या प्रत्येकींत १ हळकुंड १ सुपारी व एक पैसा घालून तीं वायनें आठ ब्राह्मणांस द्यावीं. येथें ऐरिणीप्रदान समाप्त

## वरात व वधूप्रवेश.

वधूप्रवेश ह्मणजे वधूला वरगृहीं नेणें. तें वरील प्रकार झाल्यावर वधूवरांच्या पदरांस गाठीं देऊन वधूपित्याच्या देवघरांत जावें. तेथें देवाचें दर्शन करून नंतर त्याठिकाणीं एक धातुमूर्ति अगर गणपतीची मूर्ति कुलाचाराप्रमाणें घेऊन मातापितरांस नमस्कार करून निघावें. त्यावेळेस वधूवर एका वहनावर बसवून मंगलवाद्यांच्या घोषानें उभयपक्षांच्या समाजानिशीं यथाशक्ति समारंभानें नळे, चंद्रज्योती वगैरे दारूकाम सोडीत रस्त्यानें

मिखत वरगृहीं आणावे, ह्यास वरात असें ह्मटलें आहे. वरगृहीं प्रवेश झाला ह्मणजे घरांत आणल्यानंतर श्रीलक्ष्मीचा पुतळा "मूर्ति" कणकीचा करून तेथें वरास व वधूस वसविण्याच्या जागेंपर्यंत दरवाज्यापासून शंगोळीचीं पात्रलें जमिनीवर काढण्याचा संप्रदाय आहे. त्या ठिकाणीं उभयतांस बसवून स्वस्तिवाचन करवून सुवासिनीनें श्रीलक्ष्मीस व वधूवरांस औक्षण करावें; नंतर श्रीलक्ष्मीपूजन करावें. नंतर वधूच्या आचार्याचें पूजन वरानें करावें, व तेथें आचार्यास दक्षिणा देणें ती द्यावी. नंतर वरमातेनें श्रीमहालक्ष्मीच्या झालेल्या पूजनसमयीं दूधशर्करायुक्त दाखविलेल्या नैवेद्याची वाटी घेऊन वधूच्या मुखास लावावी व थोडा अंश तिच्या पोटांत गेला ह्मणजे तिजला विचारावें कीं, "बाई धालीस?" तिनें उत्तर द्यावें कीं, 'सोन्याच्या पावलानें घरीं आल्यें.' तसेंच बाकी राहिलेलें दूध वराच्या मुखीं लावावें व त्याच्या पोटांत तें उच्छिष्ट गेलें ह्मणजे त्यास मातेनें विचारावें कीं, "बा धालास?" त्यानें उत्तर द्यावें कीं, 'लक्ष्मी घे-

ऊन घरीं आलों.' असा प्रचार आहे. हें प्रीतिवर्धनार्थ आहे. नंतर वरमातेनें ती दुधाची वाटी ठेवून पाणी हातीं घेऊन मुलीच्या डाव्या कुशीस पाणी लावून ह्मणावें कीं, जशी माझी कूस शीतळ झाली तशी तुझी होवो.' ह्मणजे त्यांतील अर्थ कीं, जशी मी पुत्रवती आहें तशीं तू व्हावीस. व आजपर्यंत मीं संसार केला आतां तू कर. नंतर श्रीलक्ष्मीच्या पुढें दोन ढीग तांदुळांचे ठेविले असतात त्यांत वरास व वधूस माहीत नसून कांहीं गळयांतील एखादा डागिना घालून ठेविला असतो तो मुलीकडून पाहून काढवितात व वरमातेस ह्मणजे सासूस तिनें सांगावें कीं, सासूबाई मी चुल भाणूस नीट करीत होतें तेथें मला हा नवरलाचा हार सापडला; असें ह्मणून सासूजवळ द्यावा. व तो घेऊन सासूनें मुलीच्या गळयांत घालावा हा प्रचार आहे. नंतर मुलीकडून वर सांगितल्याप्रमाणें आठ वायनें देववावीं. व दक्षिणा ब्राह्मणांस यथाशक्ति द्यावी. नंतर सर्वानुमतें मुलीचें नाम ठेवावें. व आलेल्या सर्व समाजास तें नांव ठेव-

लेलें सांगून साखर वाटावी. व पानसुपारी, अत्तर, गुलाब वगैरे शिष्टाचार करावा. व गणपति व महालक्ष्मी ह्यांचें विसर्जन करावें.

## झेंडा नाचविणें.

नंतर कोठें कोठें मुलीस व मुलास चांगल्या सशक्त पुरुषाच्या कडेवर देऊन वाजंत्री वाजवून थोडेसें त्या पुरुषास नाचवितात. त्यासमयीं खोबऱ्याच्या वाटींत भंडार ह्मणजे हळद देऊन उधळावा. व कुळदेवतेचें स्मरण करावें. हा कुलाचार आहे. ह्यास झेंडा नाचविणें असें ह्मणतात. नंतर उभयतांनीं देवांस व वडिलांस नमस्कार करून जी उभयतांच्या पदरास वधूगृहीं गांठ दिली आहे ती सोडविण्याविषयीं वरानें आपल्या बहिणीस प्रार्थना करून तेथें उभयता वधूवरांकडून तिनें नांवें घेववून कांहीं सौभाग्य देणगी यथाशक्ति लुगडें चोळी घेऊन गांट सोडावी असा मार्ग आहे; वधूप्रवेशविधि झाला.

## चतुर्थीकर्म.

ह्मणजे वधूवरांनीं वधूच्या माहेरी यऊन मंगलस्नान करून त्या वेदीवर उभयतावधूवरांनीं येऊन बसावें. नंतर आचमन वगैरे करून चतुर्थीकर्माचा संकल्प करावा. नंतर यथाविधि हवन करावें. नंतर पूर्णपात्र द्यावें. दक्षिणा द्यावी.

त्यासमयीं वरानें ह्मणावयाचें तें असें कीं,

॥ पतिघ्नीप्रजाघ्नीपशुघ्नीगृहघ्नीयशोघ्नीनिंदितातनूर्ज्जारघ्नींततएनांकरोमिसाजीर्यत्वंमयासह ॥ श्रुति.

अर्थ—हे वधू, जा तुझी तनु पति, प्रजा, पशु, गृह. यश, ह्या पांचांचा नाश करणारी दुष्ट आहे, तीते ह्या अभिषेकेंकरून जारादिकांचा नाश करणारी अशीते करितों, तो तू माझ्यासहित जरेप्रत पाव.

॥ प्राणैस्तेप्राणान्संदधाम्यस्थिभिरस्थीनि मांसैर्मांसानित्वचात्वचं ॥

'अर्थ—हे वधू, माझ्या प्राणाशीं तुझे प्राण योजितों, माझ्या अस्थीशीं तुझीं अस्थि योजित्में, माझ्या मांसांशीं तुझें मांस योजितों, माझ्या त्वचेशीं तुझी त्वचा योजितों.

## कंकण सोडणें.

म्हणजे पूर्वीं लग्नकंकणें म्हणून जीं उभय वधूवरांच्या हातांत बांधलीं आहेत; तीं सोडावीं, तीं अशीं कीं, प्रथम वधूच्या हातांत बांधलें गेलें आहे व मागून वराच्या हातांत बांधलें गेलें आहे तर आतां प्रथम वराचें मंत्रेंकरून सोडावें आणि नंतर तसेंच वधूचें सोडावें, तें वधूनें वराचें व वरानें वधूचें सोडावें. नंतर आचार्यपूजन करावें, दाक्षिणा द्यावी म्हणजे चतुर्थी कर्म झालें. नंतर देव प्रतिष्ठा बसवलेली उठवावी. यावत्कालपर्यंत देवप्रतिष्ठेचें उत्थापन झालें नाहीं. तोंपर्यंत, नित्य मिष्टान्न भक्षण व्हावें, असें आहे. नंतर वराकडे इष्ट व ब्राह्मण भोजन व्हावें. त्यास पडभोजन असें म्हटलें आहे. तसेंच वधूकडे व्हावें

त्यास मांडवपर्तणें अशी संज्ञा आहे. त्यानंतर पायत्रज्या, रासन्हाणीं, आठन्हाणीं, दसन्हाणीं, सोळन्हाणीं, मासन्हाणीं वगैरे प्रकार आहेत, परंतु येथें जरूर नाहीं म्हणून घेतले नाहींत.

समाप्त.

श्री

# नीतिविवाहचंद्रिका.

## ऋग्वद.

प्रथम मुलगा अगर मुलगी लग्न करण्यास योग्य झाली म्हणजे आईबापांस काळजी उत्पन्न होऊन ते आपल्या कुलशीलांस योग्य अशा स्थलांची निवड करूं लागतात.

## घटित व गणमैत्री.

मुख्यत्वें वस्तुलाभ पाहाण्याची चाल स्वाभाविकच आहे. त्या प्रमाणें मुलगा व मुलगी रूपानें व गुणानें सांग पहावयाचें करून नंतर गोत्रशुद्धि म्हणजे मुलाकडील गोत्र, प्रवर वधूपित्याच्या गोत्राशीं सांगजुळतीं पाहून त्या पुढें गणमैत्री व प्रीतियोग इत्यादि इष्ट प्रकारचें सर्व जुळतें घटि-

त पाहतात आणि नंतर पुढें तिथिनिश्चयादि कृत्यें करितात, अशी पूर्वापार शिष्टसांप्रदायिक रूढि पडली असून सर्वानुमतें ती उक्त ठरली आहे*

## वधूवयाविषयीं विचार,

शास्त्राच्या मताप्रमाणें मुलीचें वय साडेसात वर्षांवर म्हणजे आठ वर्षांचें पाहिजे. त्यापूर्वी लग्नास पात्र असत नाहीं. असा आधार आहे कीं, "मुलगी जन्मतांच प्रथम आडीचवर्षें ती चंद्राची बायको असते. पुढें आडीच वर्षें सूर्याची; आणि शेंवटीं आडीच वर्षें अग्नीची". अशा कारणामुळें ती साडेसात वर्षें लग्नास योग्य नसते. आठव्या वर्षी लग्नास पात्र होते. * गृह्यकारिकावगैरे ग्रंथांवरून दहा वर्षांपर्यंत लग्नास योग्य काल आहे असा आधार सापडतो.

---

* हें घटित पाहण्याचें कारण इतकेंच आहे कीं, "कधीं वधूवरांच्या प्रीतिसंबंधांत अंतर येऊं नये" व संतति, धन, आयुष्याची अनुकूलता असावी.

* आठव्या वर्षापासून ऋतुकालपर्यंत म्हणजे अकराव्या वर्षापर्यंत लग्न करण्यास शास्त्रांत कोठें हरकत आढळत नाहीं.

## वरवयाविषयीं विचार.

मुलाचे वयाविषयीं प्रमाण आहे तें असें:—

॥वर्षैरेकगुणांभार्यामुद्वहेत्त्रिगुणःस्वयं॥स्मृति.

अर्थ—वधूचें वय जितक्या वर्षांचें असेल त्याच्या तिप्पट वय वराचें असावें. शास्त्रांत असें सांगितलें आहे, परंतु व्यवहारांत नियम दिसण्यांत येत नाहीं.

## वचनसुपारी व तिथिनिश्चय.

वर लिहिल्याप्रमाणें स्थलविचार झाल्यावर मग वचनसुपारी करावी व तिथिनिश्चय करावा. ह्या कृत्यास ज्योतिषशास्त्रीं आधार आहे. वचनसुपारीचा विधि असा आहे कीं, मुलीच्या बापाच्या येथें वरपित्यानें आपल्या इष्टमित्रांसह जाऊन तेथें वधूपित्याकडील सर्व मंडळींत अमक्या तिथीस निश्चयें लग्न लावावयाचें असा नेम ठरवावा. प्रथम वधूपित्यानें ज्योतिषशास्त्र्यास भावी वधूवरांस कोणती लाभदायक तिथि आहे हें पहाण्यास सां-

गावें. त्यांनीं तिथि सांगितली ह्मणजे त्या तिथीस सर्वानुमतें लग्न लावावयाचें ठरवून वरपित्यानें वधूस कुंकू लावून चिरडी चोळी द्यावी व हातीं खाऊ द्यावा. ह्मणजे खडेसाखरेचा पुडा तिच्या हातीं देऊन त्यांतील थोडा अंश तिच्या मुखांत घालावा. नंतर जोश्यास वगैरे असलेल्या भिक्षुक ब्राह्मणांस भूयसी दक्षिणा देऊन इतर इष्टांचा शिष्टाचार पानसुपारी अत्तरगुलाव देऊन करावा; ह्मणजे तिथिनिश्चयविधि अथवा वचनसुपारी झाली. *तिथिनिश्चय झाला ह्मणजे उभयपक्षांकडे साहित्यास लागतात. हळद कुंकू हे पदार्थ मांगलिक असल्यामुळें सर्व साहित्यापूर्वी ते आणितात, नंतर मंडप स्थापना करून गडगनेर व कुलाचार वगैरे करितात. तो विधि असा—

---

* वचनसुपारीस व तिथिनिश्चयास शूद्रादिकांत 'साखरपुडा' ह्मणतात. वचनसुपारीचें माहात्म्य गुजराथ देशांत विशेष आहे. वचनसुपारीस गुजराथेंतलि इतर जातींत 'मागणी' असेंहि ह्मणतात. ही मागणी त्या लोकांत बारा वर्षें देखिल अगोदर करून ठेवितात.

## गडगनेर व कुळाचार.

घरच्या देवास नैवेद्य करून आपले इष्ट व शरीरसंबंधी ह्यांस जेवणास बोलावितात. त्या दिवशीं मुलास अगर मुलीस घरचा आहेर होतो. घरीं हा प्रकार एकवार झाल्यावर इष्टमित्रांकडून व आप्तसंबंधी ह्यांकडूनहि मग एकेक दिवस गडगनेराचा व आहेर होण्याचा प्रकार चालू होतो. ‡घरचा गडगनेर होतो त्याच दिवशीं बहुधा कुलस्वामीस, कुलदेवतेस व मुख्यत्वें विघ्नहर्त्या श्रीमंगलमूर्तीस लग्नास येण्याच्या निमंत्रणाची अक्षत देण्याचा समारंभ करितात. तो प्रकार असाः—

## अक्षतसमारंभ.

सर्व समाजासह वाजतगाजत व आनंदानें जाऊन प्रथम गणपतीस व मागून कुलस्वामी, कुलदेवता, इतर ग्रामदेवता ह्यांस अक्षत देऊन मग प्रथम पांच ब्राह्मणांच्या घरीं अक्षत द्यावी. आणि

‡ गडगनेर व आहेर होण्याचें मान संबंधिकांच्या संख्येवर व ज्याचें कार्य असेल, त्याच्या अनुकूल कालावर अवलंबून आहे.

नंतर सर्व आप्तसंबंधिक व इष्टमित्र ह्यांकडे द्यावी.*

## सीमांतपूजन.

हा विधि असा आहे कीं, वर परगांवीं असेल तर तेथून त्यास वऱ्हाडासहित आपल्या गांवच्या सीमेंत येतांच वधूपित्यानें स्त्रीपुरुषांच्या समाजासह जाऊन आनंदपूर्वक वाजतगाजत आणावा. सीमेंत आल्यावर तेथें प्रथम यथा प्रयोग गणपतिपूजन करून मग वराचेंहि पादप्रक्षालनादि करून गंधाक्षतांनीं यथासांग पूजा करावी. वरास शेला, पागोटें, पायांतील जोडा इत्यादि आहेर वधूपित्यानें करावा. तसेंच वधूमातेनेंहि वरमातेचे पाय धुवावेत. हळदीकुंकवादि देऊन ओंटी भरावी, शक्ति

---

* इष्टसंबंधी कोणी बाहेरगांवीं असल्यास त्यास मंगलदायक कुंकवादि चर्चून पत्रिका पाठवितात, त्यांस कंकुऱ्या अथवा लग्न चिठ्ठ्या ह्मणतात, व अक्षत देण्यांतील अर्थ असा आहे कीं, "अमक्याचा मुलगा अमक्याची मुलगी ह्यांचा विवाह अमुक दिवशीं अमुक वेळेस योजिला आहे. तरी आपण येऊन कार्यसिद्धि करावी." ह्मणणे ह्यांतील मतलब इतकाच कीं, तुमच्या मदतीनें व महशूरपणानें व साक्षीनें यथाविधि लग्न व्हावें.

असल्यास आहेर करावा. नंतर उपाध्यायास व इतर भिक्षुकांस भूयसी दक्षिणा देऊन गृहस्थांस पानसुपारी अत्तरादि देऊन बहुमान करावा. नंतर वाजतगाजत समारंभानें सर्व वऱ्हाडासहित वर जानवसाघरीं आणून पोंचवावा. जानवसाघरीं लागणाऱ्या सर्व साहित्याची व फराळाची इत्यादि तजवीज वधूपित्याकडून असावी. वर एकाच गांवांत असेल तर सदरहू सीमांतपूजनाचे प्रकार वराच्या घरींच होतात; व कोठें कोठें देवालयांतहि होतात.

## घाणा भरणें,

त्याच दिवशीं अगर दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं सुवासिनी स्त्रिया वधूस घेऊन घाणा भरतात. मग मुलीस हळदी लावून मांगलिक स्नान घालितात. पिंवळें केलेलें वस्त्र नेसावयास देतात. वधूस तें वस्त्र* कच्छहीन नेसवितात. तसेंच पिंवळी कातचोळी तिला लेववून कपाळीं मळवट भरतात.

* हें पिंवळेंवस्त्र कन्यादानसमयीं वराकडून वस्त्र मिळेपर्यंत असतें.

इतकें कृत्य झाल्यावर वधूकडे देवप्रतिष्ठा वसवितात. § नंतर वधूस लाविलेली हळद वराकडे पाठवितात. तीस उष्टीहळद म्हणतात. उष्टीहळदीचा विधि असा आहेः—

## उष्टीहळद,

मुलीस हळदी लावून नंतर ती हळद वाजतगाजत समारंभानें सुवासिनी स्त्रिया वराकडे घेऊन जातात. वधूकडून हळद येण्यापूर्वीं वरगृहीं घाणा वगैरे भरून तयारी झाली असते. ती आलेली उष्टीहळद मोठ्या सोहळ्यानें सुवासिनी स्त्रिया वराच्या अंगास लावितात. ज्या स्त्रियांनीं ही हळद वधूकडून आणली असेल त्याच स्त्रियांनीं ती वरास लावून मग मांगलिक स्नान घालावें असा प्रचार आहे. वरास मळवट भरतात. वधूकडून आलेल्या स्त्रियांस मग वराकडील स्त्रिया हळदीकुंकू देऊन ओंटी भरतात. नंतर वराकडे देव-

§ ह्या हळदीस उष्टीहळद ह्मणण्याचें कारण इतकेंचकीं, ती मुलीस अगोदर लावून मग मुलास आणतात, ह्मणून उष्टीहळद.

प्रतिष्ठा बसवितात, त्यापूर्वी बसविण्याचा अधिकार नाहीं.

## देवप्रतिष्ठा,

वधूकडील देवप्रतिष्ठा पूर्वीं बसते. हा प्रकार वर सांगितला आहेच. आतां येथें वराकडील देवप्रतिष्ठा बसते. त्याचा विधि लांबवून सांगण्याचें येथें तादृश कारण नाहीं. कारण त्यासंबंधी सर्व तयारी उपाध्यायाकडून असून यजमानास त्यांत कांहींच विशेष खटपट किंवा मन घालावें लागत नाहीं. उपाध्याय सांगेल तसें पूजन वगैरे करणें इतकेंच यजमानाकडे विशेष काय तें आहे.

देवप्रतिष्ठा बसविण्याचें कारण असें आहे कीं, योजिलेलें कार्य निर्विघ्न शेवटास जावें. उदाहरण, वरमाता किंवा वधूमाता अस्पर्श झाल्यास देवप्रतिष्ठा बसल्यावर मग तो दोष धरण्याचें कारण नाहीं, खुशाल कार्य होऊं द्यावें; मात्र त्याबद्दल श्रीशांति, हेरंबशांति इत्यादि शांत्या कराव्यात असें शास्त्रांत सांगितलें आहे.

॥नांदीश्राद्धेकृतेयस्य॥
॥भार्यारजस्वलाभवेत्॥
॥विवाहेनैवदोषःस्यात्॥
॥दोषःस्यात्मौंजिबंधने॥

अर्थः—नांदी श्राद्धानंतर वायको रजस्वला झाल्यास लग्नकार्य होण्यास बाध नाहीं; मुंजीस मात्र आहे.

ह्याचप्रमाणें उभय ह्मणजे वधूवरांकडील गोत्रजांस देवप्रतिष्ठेनंतर जननाशौच अगर मृताशौच आल्यास संकटीं लग्नकार्य होण्यास बाध नाहीं. अशाविषयीं शास्त्रांत प्रमाण आहे. देवप्रतिष्ठा वसण्यापूर्वीं अशौच आल्यास मात्र कार्य करणें रहित केलें पाहिजे. अस्तु ह्याविषयीं खुलाशाचीं प्रमाणें मुहूर्तमार्तंड व निर्णयसिंधु वगैरेंत आहेत.

देवप्रतिष्ठा झाल्यानंतर पंचमाहायज्ञ करण्यास अधिकार नाहीं असें शास्त्रमत आहे.

मुलास अगर मुलीस मांगलिकस्नान घालून मातापित्यांनीं त्यास जवळ घ्यावें आणि संकल्प

केसवा गणपतिपूजन करावें. पुढें पुण्याहवाचन§ करावें. आचार्य वगैरे उपाध्यायांनीं 'पुण्याहवाचन समयीं पूजिलेल्या कलशांतून उदक घेऊन वधू अगर वर ह्याजवर व त्याच्या मातापितरांवर मंत्रोक्त अभिषेक* करावा. सुवासिनींनीं त्यावेळीं मंगलदायक औक्षण त्या त्रिवर्गास करावें.

इतकें कृत्य झाल्यावर यजमानांनीं उपाध्यायाचें पूजन करून त्याकडून मंडपाकरितां शाखा घ्याव्यात. त्या आंब्याच्या पानांत गुंढाळलेल्या असाव्यात. शाखा कोऱ्या सुपामध्यें मांडून अग्नेयीदिशेपासून विधियुक्त स्थापन‡ कराव्या.

मंडपशाखा सुपांत मांडून त्यांची पूजा करावी, कारण त्यांत मंडपदेवतांची स्थापना असते. त्याच सुपामध्यें गौर्यादि मातृकांची पूजा करावी. मातृकाभावीं सुपाऱ्या मांडितात.

---

§ पुण्याहवाचन मंगलदायक असून आशीर्वादार्थ आहे.

* अभिषेकहि आशीर्वादार्थ आहे.

‡ मंडपाविषयीं आतां असा प्रचार पडला आहे कीं, मंडप पूर्वींच हवा तसा मर्जीनुरूप घालतात.

इतकें कृत्य झाल्यावर येथें नांदी[illegible]रावें लागतें. श्राद्ध झाल्यावर घरचा आहेर होतो व त्यानंतर शरीरसंबंधी ह्यांजकडून इष्टमित्रांकडून होतो असा प्रकार* आहे. नंतर पूजन झालेला मोद मातेनें व सूप पित्यानें ह्मणजे देवप्रतिष्ठा बसविणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं घेऊन देवघरांत त्याची स्थापना करून तेथें अखंड दीप ठेवावा. येथपर्यंत सांगिलेले विधि सर्व देवप्रतिष्ठेंत मोडतात.

## §वाग्निश्चय.

देवप्रतिष्ठेचा विधि झाल्यावर पुढें वाग्निश्चय विधि करितात. त्याचा विधि असा आहे कीं, वरपित्यानें आपल्या मंडळीसहित वधूपित्याच्या येथें जाऊन प्रथम श्रीगणपतिपूजन करावें. नंतर

---

§ नांदीश्राद्ध करण्याचें कारण मंगलकार्यांत पितृसंबंध असावा.

* ह्यास शिष्टाचार ह्मणतात.

§ हा वाग्निश्चय ग्रंथकार प्रथम लिहून पुढें देवप्रतिष्ठादि कृत्यें लिहितात, परंतु हल्लीं प्रचारांत प्रथम देवप्रतिष्ठा वगैरे व पुढें वाग्निश्चय असें आहे. ह्याचें कारण वाग्निश्चय झाला ह्मणजे प्रतिकूलादि दोष पडतात. ह्याकरितां मध्यें व्यवधान येऊं देत नाहींत त्याप्रमाणें आह्मींहि ह्या ठिकाणींच लिहिला आहे.

वरपित्यानें यथाविधि संकल्प करवा. नंतर वधूपित्यानेंहि त्याचप्रमाणें संकल्प करून पांच सुपाऱ्या व पांच हळकुंडें हातीं घेऊन देव, मुनि, विप्र, पितर, कुलदेवता, ह्या पांचांच्या साक्षीनें मी तुह्मास माझी मुलगी देतों. असें ह्मणावें. व त्या पांच सुपाऱ्या व हळकुंडें वरपित्याच्या पदरीं बांधावीं. ह्या वेळीं स्मृति म्हणावी लागते ती अशी,

॥ वाचादत्तामयाकन्या पुत्रार्थेस्वीकृतात्वया । कन्यावलोकनविधौ निश्चितस्त्वंसुखीभव. ॥ स्मृति.

अर्थः—कन्येचें अवलोकन करण्याविषयीं तू निश्चित ( स्थिर ) झालास ह्मणून मीं वाणीनें तुझ्या पुत्राकरितां कन्या दिली आहे; आणि तू स्वीकृत केली आहे. आतां तूं सुखी (निश्चित) हो.

असें ह्मणून त्या पांच सुपाऱ्या व पांच हळकुंडें वधूपित्यानें वरपित्यास द्याव्या. ह्मणजे पदरीं बांधाव्या. नंतर वरपित्यानें त्याचप्रमाणें घेऊन ह्मणावें:—

॥ वाचादत्तात्वयाकन्या पुत्रार्थेस्वीकृतामया । वरावलोकनविधौ निश्चितस्त्वंसुखीभव ॥ स्मृति.

अर्थ—वराचें अवलोकन करण्याविषयीं तूं स्थिर झालास. आणखी माझ्या पुत्राकरितां वाणीनें तूं कन्या दिली आहे; आणि मीं स्वीकृत केली आहे. आतां तूं निश्चिंत हो.

ह्याप्रमाणें उच्चार करून त्या सुपाऱ्या व हळकुंडें वधूपित्याच्या पदरीं बांधावीं, आणि वधूच्या कपाळीं कुंकू लावून चिरडी, चोळी, सोन्याची सरी, व मुद्रिका सुवर्ण, रौप्य इत्यादि द्यावें. ओंटीं भरावी, खाऊ द्यावा. त्यानंतर ब्राह्मणांस दक्षिणा व गृहस्थ मंडळीस पानसुपारी द्यावी. ह्याप्रमाणें वाग्निश्चयाचा विधि होय.

## तेलफळ अथवा तेलसाडी.

वराकडून एके भाड्यांत तेल व कांहीं फळें वगैरे ओंटीचें सामान व खालीं रुखवताचा प्र-

कार सांगितला आहे त्याप्रमाणें रुखवतासह तेलफळ मोठ्या समारंभानें वाजतगाजत वधूकडे नेतात. तेथें यथाप्रचारें वधूस चिरडी चोळी देउन ओंटी भरतात. कोठेंकोठें सद्रीं दिलेल्या चिरडीची घडी वर्षभरपर्यंत मोडीत नाहींत. तसेंच ज्या ओल्या नारळानें ओंटी भरतात तोच नारळ वर्षपर्यंत ठेविण्याचा संप्रदाय आहे. नंतर वधूनें गौरीहराची प्रार्थना करीत बसावें.

## गौरीहरपूजन.

हा विधि असा आहे कीं, एक आंब्याचें झाड काढून त्याच्या खालीं भूमीवर पाटा ठेवून त्यावर गव्हांचा अगर तांदुळांचा चौक करून त्यावर हळदीची एक मूर्ति गौरीहराची ह्मणजे शंकरपार्वतीची मांडावी. लहान लहान मातीचीं बोळकीं चहूंबाजूस चार ठिकाणीं एकावर एक पांचपांच किंवा सातसात मांडून केळीचा वगैरे मंडप घालावा. सभोंवतीं दीप प्रज्वलित करून तेथें वधूनें निश्चित मन करून शंकरपार्वतीचें पूजन करी-

त बसावें. ह्यास ‡ गौरीहरपूजा ह्मणतात.

लग्नतिथीच्या दिवशीं वधूपित्यानें उपोषित असावें. कारण कन्यादान करावयाचें ह्मणून. भोजनोत्तर दान करणें गौण सांगितलें आहे. त्यांतून हें कन्यादान असतें. तेव्हां उपोषित असणें फारच वाजवी होय. इकडे वरगृहीं वरानें आपलें स्नानसंध्यादि नित्य कर्म आटोपून बसावें.

## रुखवत समारंभ.

वधूगृहाकडील स्त्रीपुरुषांनीं ह्यासमयीं वाजतगाजत वरास फराळाचें न्यावें ह्यास रुखवत असें ह्मणतात. हें फराळाचें साहित्य वरगृहीं समारंभानें नेल्यावर तेथें वधूबंधूनें अगर दुसरा कोणी वडील असल्यास त्यानें प्रथम गणपतिपूजन करून मग वराचें पादप्रक्षालन करून गंधाक्षतादिकें करून यथाविधि पूजा करावी. वरास शेला, पागोटें, ह्यायांतील जोडा इत्यादि आहेर अर्पण करावा.

‡ गौरीहर पूजेचें कारण इतकेंच कीं, योजिलेला वर निर्विघ्नपणें मिळावा.

आणि पागोट्यास पुष्पांची मुंडावळ बांधून हातीं नारळ द्यावा. नंतर बायकांनीं त्यास आणलेल्या रुखवतांतून फराळास घालून तंबूल द्यावा. वरा बरोबर वरपक्षाकडील लहान मुलें व मुली फराळास बसविण्याचा प्रचार आहे. काजळ डोळ्यांत घालून गालासही थोडें ‡ लावावें. इतकें कृत्य झाल्यावर आलेल्या स्त्रियांस वराकडील स्त्रियांनीं हळदीकुंकवादि देऊन ओंट्या भराव्या. मंडळीस पूर्ववतप्रमाणें पानसुपारी अत्तर गुलाब देऊन बहुमान करावा. हा रुखवतसमारंभ झाला. मग वराची तयारी वधूगृहीं जाण्याची होते.

## वर वधूगृहीं जाण्याचा समारंभ,

वरील सर्व प्रकार झाल्यावर वरानें घरांतील कुलस्वामीस, वडिलांस, ब्राह्मणांस नमस्कार करून त्यांची आज्ञा घ्यावी आणि वधूगृहीं जाण्यास अश्वारूढ व्हावें. वर घोड्यावर बसला म्हणजे व-

‡ गालास काजळ लावण्याचा स्त्रियांचा प्रचार आहे, कारण दृष्टि होऊं नये ह्मणून.

धूकडील मंडळीनें त्यास व त्याच्या सर्व आप्तव-र्गादि स्त्रीपुरुषांस मोठ्या समारंभानें वाजतगाजत चौऱ्या व आवदागिरीसहित दारू उडवीत, पुष्प-वर्षाव करीत वाद्यघोष करीत त्याचप्रमाणें मंत्रघो-ष करीत आनंदपूर्वक वधूगृहीं मंडपद्वारीं आणावें. तेथें दहींभात व उदकाचा कलश दासी करवी त्या-वरून उतरून नंतर मंडपांत घेऊन जावें. असा सांग प्रचार ह्या समयीं आहे.

## मधुपर्क.

वर मंडपांत आल्यावर सुवासिनींनीं मंगलदायक औक्षण करावें. आणि पुढें मधुपर्क करावा. मधु-पर्काचा विधि असा आहे कीं:—वर मंडपांत आल्या-वर त्याकडून पोशाक काढवून त्याचें पादप्रक्षाल-नादि पूजन वधूपित्यानें करावें. नंतर ( काशाच्या वाटींत दहीं, मध, तूप, इत्यादि घालून उपाध्या-यांनीं तयारी केली असते. ) ती वराच्या उजव्या हातावर द्यावी. त्यानें ती उघडून त्यांत करंगळी जवळचें बोट व अंगठा तीन वेळ समंत्र प्रदक्षिणे-

तुल्य फिरवावें. व चार दिशांकडे यथाविधि थोडें थोडें टाकावें. नंतर बाकी राहिलेलें तीन वेळ समंत्र प्राशन करावें. मधुपर्क एकवेळ प्राशन केला तरी उष्टा होत नाहीं ह्मणून तो पुनः ‡ प्राशन करण्यास हरकत नाहीं.

मधुपर्क झाल्यावर वधूपित्यानें त्यावेळीं "गवालंव" ह्मणजे गोहत्या करावी लागते. परंतु कलींत वर्ज्य असल्यामुळें निष्क्रय गवालंव करितात; ह्मणजे यथाशक्ति द्रव्यास समंत्र स्पर्श करितात.

'गवालंव' झाल्यावर वधूपित्यानें वराच्या कपाळीं गंध लावावें. नंतर समंत्र पितांवर नेसण्यास द्यावा. यज्ञोपवीत समंत्र देऊन धारण करवावें. आचमन करवून मग शालजोडी वगैरे द्यावें. पुष्पमाळा घालून मुंडावळ वांधावी. यथाशक्ति अलंकार द्यावे. धूप, दीप, नैवेद्य, फल, तांवुलादि यथासांग पूजन त्यावेळीं वधूपित्यानें ( वर केवळ लक्ष्मीनारायण समजून ) वराचें करावें. ह्मणजे मधुपर्कविधि झाला.

---

‡ मधुपर्क उष्टा होत नाहीं ह्यास शास्त्राधार आहे.

## लग्न समारंभ.

वरील सर्व प्रकारानंतर वधू गौरीहराजवळ प्रार्थना करीत बसली, असते तेथून तीस मध्यघरांत आणून तांदुळांची राशि केलेल्या पाटावर पूर्वाभिमुख करून उभी करावी व मध्यें अंतरपाट यथाविधि धरावा. व दुसऱ्या बाजूस म्हणजे वधूच्या समोर वधू दृष्टीस न पडे अशा रीतीनें वरास आणून पश्चिमाभिमुख विधिवत् उभें करावें. व ब्राह्मणांनीं संहितेंतील सूक्तांचे मंत्र आहेत ते आशीर्वादार्थ ह्मणावे. नंतर तेथें ज्योतिषी वगैरे ब्राह्मणांनीं धरलेला इष्टकाल होईपर्यंत "मंगलाष्टकें" ह्मणावीं. तशीं ह्मणत असून त्यासमयीं वधूच्या मामानें अगर तदभावीं जो कोणी असेल त्यानें वधूच्या मागें उभें राहावें. त्याचें कारण मातुलांनीं देवाची आराधना करण्या करितां आहे. व तीं मंगलाष्टकें ह्मणते समयीं दरएक स्तुति संपतांच उभयपक्षांकडील स्त्रीपुरुषांनीं अक्षता वधूवरांवर टाकीत असावें. इकडे जोशीबुवांनीं घटिका यथाविधि घालून इष्टकाल साधित बसलें असावें.

इष्टकाल आला ह्मणजे अंतरपाट काढून "साव- धान† " असा ध्वनि करून टाळी वाजवावी. व- वधूनें वराच्या गळ्यांत पुष्पांची माळ घालावी; अ- गर वराच्या मस्तकावर अक्षता टाकाव्या. (ज- नरूढि आहे कीं, टाळी सर्वांनीं वाजवावी.)

ह्या प्रकारें "सावधान" झालें ह्मणजे आनंदपूर्वक वाद्यघोष मंडपांत व्हावा. समारंभास आलेल्या गृहस्थांस पानसुपारी, अत्तरगुलाव, हारतुरे, इत्या- दि देऊन वहुमान करावा. (कांहीं लोकांत ह्या- वेळीं सर्व स्त्रीपुरुषांस नारळ देण्याची चाल आहे. कोठें अखंड सुपाऱ्या देण्याची चाल आहे.) आ- चार्य, उपाध्याय, वैदिक, शास्त्री ब्राह्मणांस (देकार) दक्षिणा द्यावी. सर्व सुवासिनी स्त्रीयांस हळदी- कुंकू देऊन ओंट्या भराव्या. असा प्रचार लग्न- समयीं असून तो सांग झाला ह्मणजे लग्न झालें असें मानितात. (वर लिहिलें इतकें कृत्य झा- लें ह्मणजे सांगलग्नविधि झाला असें समजून कां-

† ही वधूवरांस बजावणी आहे कीं, तुह्मा उभयतांचें लग्न लागतें सावध व्हा.

हीं लोक घरोघर चालते होतात, परंतु इतकें झालें ह्मणजे लग्नविधि संपूर्ण झाला असें शास्त्रानुमतें नाहीं. कारणपरत्वें ह्यापुढेंहि लग्न फिरतें असें शास्त्रमत आहे.)

माळ घातल्यानंतर व अक्षता टाकिल्यानंतर वैदिक वगैरे आचार्य ब्राह्मणांनीं आशीर्वादार्थ श्रुतींतील मंत्रेंकरून प्रतिष्ठा करावी. ह्मणजे तेणेंकरून उभयतांमध्यें अविच्छिन्न प्रीति राहील असा आशीर्वाद होतो. वरील प्रकार झाल्यावर वराच्या ठिकाणीं वधूस व वधूच्या ठिकाणीं वरास बसवावें.§

## कन्यादान.

वधूपित्यास कन्यादान करणें आहे ह्मणून त्यानें संकल्प करावा तो असाः—

॥ मम समस्तपितॄणां निरातिशय

§ असें करण्याचें कारण असें आहे कीं:— वरास कन्यादान घेणें आहे. दान घेणारा उत्तराभिमुख असावा; परंतु कन्यादान घेणारा पूर्वाभिमुख असावा. कन्यादान देणारा उत्तराभिमुख असावा. ह्यास शास्त्राधार आहे.

सानंदब्रह्मलोकावाप्त्यादिकन्यादानक
ल्पोक्तफलावाप्तये अनेनवरेणास्यांकन्य
कायांउत्पादयिष्यमाणसन्तत्याद्वादशा
वरान्द्वादशपरान्पुरुषांश्चपवित्रीकर्तुं
आत्मनश्चलक्ष्मीनारायणप्रीतयेब्रा
ह्मविवाहविधिनाकन्यादानमहंकरिष्ये॥

अर्थ—माझ्या पितृगणास निःसीम आनंद ज्यांत आहे अशा ब्रह्मलोकाची प्राप्ति आदिकरून कन्यादानकल्पांत सांगितलेलें संपूर्ण फल मिळण्याकरितां ह्या वरापासून ह्या कन्येच्या ठिकाणीं उत्पन्न होणाऱ्या संततीच्या योगानें पूर्वींचे बारा व पुढचे बारा पुरुष ह्यांस पवित्र करण्यासाठीं व आपल्यावर लक्ष्मीनारायणाची प्रीति व्हावी ह्यासाठीं ब्राह्मविवाहविधीनें मी कन्यादान करितों; असें ह्मणून वधूपित्यानें उदक सोडावें.

नंतर वधूपित्यानें प्रार्थना करावी.

॥ कन्यांकनकसंपन्नांकनकाभरणैर्युतां

**दास्यामिविष्णवेतुभ्यंब्रह्मलोकजिगीषया विश्वंभरःसर्वभूतःसाक्षिण्यःसर्वदेवताः इमांकन्यांप्रदास्यामिपितॄणांतारणायच ॥**

अर्थ—ब्रह्मलोकप्राप्तीच्या इच्छेनें व पितृवर्गास तारण्यासाठीं हळद लाविलेली आणि सुवर्णालंकारांनीं युक्त ही कन्या विष्णुस्वरूप तुजला मी निश्चयेंकरून देतों. ह्यास सकल देवता साक्षी आहेत; किंबहुना सर्वव्यापक परमात्मा साक्षी आहे. असें ह्मणून वराच्या हातावर मुलीचा हात देऊन वर जलधारा धरावी. त्यावेळीं ह्मणावें तें असें:—

**॥ कन्यातारयतु पुण्यंवर्धतां शिवा आपःसंतु ॥**

अर्थ—कन्या सर्व दुखःसमुद्रांतून तारक होवो' पुण्य वृद्धिंगत होवो. उदक कल्याणप्रद होवो.

वगैरे ह्मणून नंतर कन्या वरास दान देणें, ती आपल्या कुलांतील त्रयी ( ह्मणजे तीन पुरुषां

ची नांवें ) सगोत्र घेऊन वराकडीलहि तसाच उच्चार करून उदक घालावें. वरानें ह्मणावें,

ॐ स्वस्ति अर्थ—घेतली. नंतर वधूपित्यानें वधूच्या खांद्यावर हात ठेवून ह्मणावें,

॥द्यौस्त्वाददातुपृथ्वीप्रतिगृण्हातु॥ श्रुति.

अर्थ—आकाश तूते देवो, आणि पृथ्वी ग्रहण करो. नंतर वरानें ह्मणावें:—

॥धर्मप्रजासिद्ध्यर्थंकन्यांप्रतिगृण्हामि॥

अर्थ—धर्मसंतत्यर्थ कन्येचा प्रतिग्रह करितों.

नंतर वधूपित्यानें प्रार्थना करावी.

॥गौरींकन्यामिमांविप्रयथाशक्तिविभूषितां गोत्रायशर्मणेतुभ्यंदत्तांविप्रसमाश्रय कन्येममाग्रतोभूयाःकन्येमेदेविपार्श्वयोः कन्येमेपृष्ठेताभूयास्त्वद्दानान्मोक्षमाप्नुयाम् ममवंशकुलेजातापालितावत्सराष्टकं तवाविप्रमयादत्तापुत्रपौत्रप्रवर्धिनी ॥

अर्थः—केवळ ब्रह्मवृत्तीनें आचरण करणाऱ्या हे

§ आठ वर्षावर जितकीं वर्षे असतील तसा उच्चार करावा.

ब्राह्मणा, कुलीन कल्याणस्वरूप अशा तुला ही गौरीलक्षण कन्या यथाशक्ति अलंकृत केलेली दिली तू ग्रहण कर. हे योग्य कन्ये, तुझ्या दानजन्य पुण्यस्वरूपानें तू माझ्या पुढें, मागे, व बाजूंस हो; ह्मणजे माझ्या भोंवतीं असलेल्या संसारबंधनाच्या निरसनद्वारा तुझ्या दानानें मी मोक्षास पावेन. हे विप्रा, माझ्या वंशांत उत्पन्न झालेली ही कन्या; कुलीन, आठ वर्षेपर्यंत संरक्षित केलेली तुला दिली. हिच्या योगानें पुत्रपौत्रादि वंशाची वृद्धि होणारी आहे.

नंतर वधूपित्यानें ह्मणावें:—

**॥ धर्मेचअर्थेचकामेचत्वयेयंनातिचरितव्या ॥** श्रुति. ॥

अर्थः—धर्माच्या ठायीं, अर्थाच्या ठायीं व कामाच्या ठायीं तूं ही कन्या न त्यागावी. नंतर वरानें ह्मणावें:—**नातिचरामि.** ॥श्रुति.

अर्थः—त्याग करणार नाहीं. नंतर यथाशक्ति कन्यादानानिमित्त वरास भूमि, अलंकार, गायी

इत्यादि यथासंभव द्यावें; व दक्षिणा द्यावी. वरानें ह्मणावें. ॐस्वस्ति. ह्मणजे कबुलात झाली कीं मीं घेतली.

## सुवर्णाभिषेक.

नंतर सुवर्णअभिषेक करावा. तो असाकीं, उपाध्याय वगैरेंनीं मंत्र पठण करून वधूवरांवर करावा. ह्यास सुवर्णअभिषेक ह्मणण्याचें कारण, सुवर्ण उदकांत घालून करावा लागतो. ह्मणून त्यास सुवर्णअभिषेक ह्मटलें आहे. हा आशीर्वादार्थ आहे

## कंकणबंधन.

उभयपक्षांच्या आचार्यांनीं कच्चें सूत सप्रमाण घेऊन दुहेरी करून यथाविधि वरास व वधूस वेष्टन§ करावें. व तें यथाविधि काढून समंत्र उभयता वधूवरांच्या हातांत परस्परानें यथाविधि कंकण बांधावें.

---

§ असें करण्याचें कारण हेंच कीं, उभयतांस ब्राह्मणांनीं त्या दिवसापासून एकत्र केलें ह्मणजे बांधिलें इत्यादि.

## अक्षतारोपण.

नंतर तांदुळांच्या अक्षता दुधांत भिजविलेल्या वधूवरांनीं एकमेकाच्या मस्तकावर टाकाव्या. त्या समयीं मंत्र ह्मणावे लागतात. त्यांत प्रथम वधूनें व दुसऱ्यानें वरानें याप्रमाणें पाळीपाळीनें एकमेकावर टाकाव्या. सरतेशेवटीं सातव्यानें वरानें त्या अक्षता टाकाव्या. त्यासमयीं उभयतांनीं मंत्र ह्मणावे लागतात, ते असे

**॥ भगोमेकामःसमृध्यतां यज्ञोमेकामः समृध्यतां श्रियोमेकामःसमृध्यतां धर्मोमेकामःसमृध्यतां प्रजामेकामःसमृध्यतां यशोमेकामःसमृध्यतां ॥**

अर्थः—ऐश्वर्याविषयीं जी माझी इच्छा ती सफल होवो. यज्ञाविषयींची इच्छा सफल होवो. संपत्तीविषयींची इच्छा सफल असो. धर्माविषयींची इच्छा सफल असो. संततीविषयींची इच्छा सफल असो. यशाविषयींची इच्छा सफल असो.

नंतर सुवासिनींनीं वधूस कुंकू लावून उभयव-

धूवरांच्या गळ्यांत पुष्पांच्या माळा घालाव्या. त्या- वेळेस वराकडील स्त्रियांनीं वधूस औक्षण करावें. मग वरानें वधूस वस्त्रकंचुकी सह द्यावें. त्यास- मयीं मंत्र ह्मणावा. त्यास ( अष्टपुत्रां ) ह्मणतात. त्याचा ॥ मंत्र ॥

**॥ युवंवस्त्राणिपीवसावसाथे युवोरछिद्रा मंतवोहसर्गाः अवातिरतमनृताविश्व ऋतेनमित्रावरुणासचेथे ॥**

अर्थः—तुम्ही हीं पीतवस्त्रें नेसा आणि तुमचे स्वभाव अछिद्रमित्रपणाच्या योगानें युक्त असोत आणि ते स्वभाव सत्य भाषण करणाऱ्या विश्वातें प्रियभाषणाच्या योगानें प्रमाण करीत व मित्र, वरुणदेवताप्रत तुम्ही संयुक्त व्हा.

नंतर वधूच्या गळ्यांत वरानें समंत्र मंगलसूत्र बांधावें त्यासमयीं मंत्र ह्मणावा तो असाः—

**॥ मांगल्यतंतुनानेनममजीवनहेतुना कंठेबध्नामिसुभगेसाजीवशरदांशतं ॥**

अर्थः—माझें जीवन कारण ह्या मंगल तंतूनें तु-

ला कंठाच्या ठायीं बांधितों. तर हे सुभगे तूं शंभर वर्षें जीवंत रहा." नंतर पायांतील जोडवीं व विरवल्या हे डागिने द्यावे. नंतर पांच सुपाऱ्या तांदुळांच्या ढिगांवर मांडून त्यांची पूजा यथाविधि करावी. त्या पांच सुपाऱ्यांत एक श्रीगणपति-स्वरूप दुसरी वरुण, तिसरी लक्ष्मी, चवथी पार्वती आणि पांचवी शची अशा मांडाव्या. त्यांत श्रीगणपति व वरुण ह्यांची पूजा वरानें करावी, व वाकीच्यांची पूजा वधूनें करून सौभाग्यास्तव प्रार्थना करावी. नंतर सौभाग्य वायनें आठ द्यावीं. मग ब्राह्मणांनीं आशीर्वादार्थ संहितेंतील जे सहा मंत्र आहेत ते ह्मणून आशीर्वाद द्यावा.

## होम.

नंतर वेदीवर म्हणजे बोहोल्यावर आचार्य, वर व वधू ह्यांनीं जावें. त्याचा विधि असा आहे कीं, पूर्वपश्चिम पांच हात व दक्षिणोत्तर चार हात असें असावें. तें प्रमाण वधूच्या हाताचें असावें. मुहूर्तमार्तंडांत वराच्याहि हाताचेंहि प्रमाण घेतलें आ-

हे. प्रयोगदर्पणांत आचार्यांच्या सहा पावलांचें प्रमाण घेतलें आहे. आतां बोहोलें अमकट्याच वेळेस घालावें, असें शास्त्रांत कोठें आढळत नाहीं. परंतु विवाहासंबंधी कोणत्याहि कार्यास विवाहापूर्वी ३-६-९ हे दिवस वर्ज्य करून यथाविधि प्रचाराप्रमाणें केलेलें असतें. त्या वेदीवर प्रथम सांगितल्याप्रमाणें वर व आचार्यांनीं असून वरानें यथाक्रम संकल्प करावा.

नंतर बोहोल्यावर स्थंडिल सप्रमाण केलें असतें. त्याजवर पंचभूसंस्कार करावे. ह्मणजे भूमि शुद्ध करावी. ती अशी कीं, प्रथम स्थंडिलावर पश्चिमेकडून पुर्वेस दर्भांनीं समंत्र झाडावें. मग गायीच्या शेणानें समंत्र सारवावें. नंतर सामिधेनें पुर्वपश्चिम तीन रेपा समंत्र काढून निघालेली माती करंगळी जवळील हाताच्या बोटानें व अंगठ्यानें उत्तरेस मंत्रें करून काढून टाकावी. व त्याजवर समंत्र पाणी शिंपडावें. हे पंचभूसंस्कार झाले.

नंतर तेथें “ लौकिकअग्नि ” ह्मणजे घरांतील एका सुवासिनीनें तांब्याच्या ताम्हनांत अग्नि आणा-

वा, त्याजवर आंब्याच्या अगर पंचपल्लवांपैकीं कोणत्याहि पल्लवांनीं आच्छादन केलेलें असावें, व तो "योजक" अशा नांवानें स्थापन करावा. तो स्थापन झालेला अग्नि कार्य समाप्तीपर्यंत विझूं नये, ह्मणून लांकूड अगर गोंवरी त्यास लावून ठेवावी, व त्याचें चागलें संरक्षण करावें. नंतर होम करावा तो असाः—

## लाजाहोम.

"लाजाहोम" ह्मणजे अग्नीस साळींच्या लाह्यांच्या आहुति यथाविधि द्याव्या, हा विधि वधूवरांकडून व्हावा; तो असा कीं, वरानें प्रथम वधूच्या हातास पाणी लावून नंतर तूप लावावें. नंतर वधूच्या भावानें भाऊ नसल्यास तदभावीं कोणी तरी लाह्या यथाविधि अंजलींत द्याव्या. तिनें व वरानें यथाविधि अग्नींत हवन करावें. नंतर वधूनें व वरानें अग्नीस प्रदक्षिणा करून जागेवर आले ह्मणजे वरानें वधूचा हात पांच बोटांसहित धरावा, व ह्मणावें तें असेंः—

॥ॐगृभ्णामितेसौभगत्वायहस्तंमयाप त्याजरदष्टिर्यथासः भगोअर्यमासवि तापुरंधिर्मह्यंत्वादुर्गार्हपत्यायदेवाः अ मोहमस्मिसात्वंसात्वमस्यमोहं द्यौरहं पृथ्वीत्वम् सामाहमृक्त्वं तावेहविवहाव हैप्रजांप्रजनयावहैसंप्रियौरोचिष्णुसुम नस्यमानौजीवेवशरदःशतं ॥

अर्थः—सौभाग्यासाठीं मीं तुझा हात धरिला आहे, तर पति जो मी त्या माझ्यासह जरदष्टि हो. भग, सविता आणि अर्यमा हे देव तुला आणि मला गार्हपत्यास्तव शरीर आणि बुद्धि देते झाले. मी अत्यंत मोही आहें. तर ह्याचा मोह तूच आहेस. मी आकाश आणि तू पृथ्वी आहेस. तें दोघे आज विवाहित झालों. सवव प्रजेते उत्पन्न करूं आणि प्रीतीनें तेजस्वी देवासारखे शतवर्षं जरेप्रत पावूं.

नंतर वरानें वधूस अश्मारोहण करवावें. लग्नजे एक दगड तेथें ठेवून त्याजवर उभें करावें. व

ह्मणावें तें असें कीं:—

॥ ॐ इममश्मानमारोहाश्मेवत्वंस्थिरा भव सहस्वपृतनायतोभितिष्ठपृतन्यतः॥

अर्थ:—ह्या दगडावर तू आरोहण करून त्यासारखी स्थिर होऊन सैन्याचा उपद्रव तो जसा सहन करितो. तसी तू सहनशील हो.

नंतर मागें सांगितल्याप्रमाणें वरानें वधूच्या अंजलीस यथाविधि तूप वगैरे लावून यथाविधि लाजाहोम करावा. ह्याप्रमाणें एकंदर तीन वेळ करावें. नंतर वधूनें अग्नीस प्रदक्षिणा करून उभें रहावें. नंतर वरानें सुपांत शिलक राहिलेल्या लाह्या सुपाच्या कोनानें यथाविधि अग्नींत द्याव्या. मग चौथ्यानें प्रदक्षिणा करावी. व लाजाहोम झाला ह्मणजे वधूबंधूस वरानें कानपिळ्याचें पागोटें द्यावें. असा संप्रदाय आहे.

## सप्तपदी.

"सप्तपदी" ह्मणजे अग्नीच्या उत्तरेस तांदुळांचे सात पुंज करावे. त्यांवर क्रमानें वधूचें उ-

जवें पाऊल वरानें हात धरून ठेववावें. ते वेळेस हे पुढील मंत्र ह्मणावे.

॥ इषएकपदीभव सामामनुव्रताभव पुत्रान्विंदावहैबहूंस्तेसंतुजरदष्टयः ॥प्रथमं॥

अर्थः– हे प्रिये तू एकपदी हो. ती तू मला अनुकूल हो. ह्मणजे बहुत पुत्रांस प्राप्त होऊं ते ‡जरदष्टि असोत.

॥ ऊर्जेद्विपदीभव ॥

अर्थ–प्रजोत्पादनशक्तीसाठीं द्विपदी हो.

॥ रायस्पोषायत्रिपदीभव ॥

अर्थ–धनाच्या पुष्टीस्तव तू त्रिपदी हो.

॥ मायोभव्यायचतुष्पदीभव ॥

अर्थ–लक्ष्मीच्या संरक्षणाकारणें तूं चतुष्पदी हो.

॥ प्रजाभ्यःपंचपदीभव ॥

अर्थ–संततीकरितां तू पंचपदी हो.

॥ ऋतुभ्यःषट्पदीभव ॥

‡ दीर्घकाल ज्यांचा वंश राहील असें.

अर्थ—तू ऋतूंसाठीं षट्पदी हो.

॥ सखासप्तपदीभव ॥

अर्थ—सख्यत्वास्तव तू सप्तपदी हो.

ही सप्तपदी झाली. येथून लग्न फिरणें नाहीं. नंतर वधूवरांचीं मस्तकें एकास एक लावून उपाध्यायांनीं यथाविधि अभिषेक करावा. तो "पूर्णपात्र" ह्मणजे तांब्याच्या ताम्हनांत अगर तदभावीं यथाशक्ति चांदीच्या अगर पानांच्या द्रोणांत पाणी घालून पूर्वीं बहुल्यावरील तयारींत उपाध्यायानें करून ठेविलें असतें, त्या उदकानें अभिषेक करावा. नंतर प्रधानहोम यथाविधि करावा. नंतर वरानें आपल्या हातास थोडा तुपाचा अंश लावून वधूच्या हृदयास लावावें. व तिच्या उरास हात लावावा. व वरानें मंत्र ह्मणावा तो असाः—

॥ संमजंतुविश्वेदेवाःसमापोहृदयानिनौ
संमातरिश्वासंधातासमुदेष्ट्रिदधातुनौ ॥

अर्थः—सर्वदेव, उदक आपलीं उभयतांचीं मनें किंवा मनाचे संकल्पादिक जे धर्म आहेत, त्यांते

अत्यंत गुण देऊन संस्कारयुक्त करोत. अनुकूल वायु व अनुकूल ब्रम्हदेव वाणीनें आपणांस धर्मादिक उपदेश देवोत.

नंतर वरानें हात धुऊन " स्विष्टकृत " होम यथाविधि करावा. नंतर ध्रुव वगैरे सप्त ऋषींचें दर्शन अगर स्मरण उभयतांनीं करावें. नंतर "दक्षिणाकार" ह्मणजे ब्राह्मणांस दक्षिणा यथाशक्ति द्यावी. परंतु हा दक्षिणेचा प्रकार पूर्वींच होण्याचा पाठ आहे. कोठें कोठें लग्नसोहळा समाप्त झाल्या नंतर सभा करून दक्षिणा देण्याचा पाठ आहे. विवाहवेदीजवळ वैदिक वगैरे आचार्य असतील त्यांस दक्षिणा द्यावी. एथें विवाह होम समाप्त झाला.

## सुनमुख.

वरमातेनें, आपल्या पुत्रानें मिळविलेल्या बायकोचें ह्मणजे सुनेचें मुख पाहणें, ह्यास सुनमुख पाहणें असें ह्मटलें आहे. लग्नसमारंभास प्रारंभ झाल्यापासून वरमाता वधूकडील मंडपांत हा का-

लपर्यंत येणें नाहीं; असा कोठें कोठें प्रचार आहे. लग्न लागल्यावर ह्मणजे विवाहहोम संपल्यावर वधूमातेनें तीस समारंभानें वाजतगाजत सन्मानानें आणिल्यावर तिनें घेऊन मुलीच्या कपाळीं कुंकू लावून डागिने घालावे. अवकाश नसल्यास गळ्यांत पुतळ्यांची अगर कारल्यांची व हरपररेवड्यांची कशाचीतरी सुवर्णभूषणाची माळ घालून मांडीवर घेऊन तोंडांत साखर घालावी. ह्मणजे तोंड गोड करावें. मुलीनें वरमातेस ह्मणजे आपल्या सासूस नमस्कार करून पांच वायनें द्यावीं. वरमातेची वधूमातेनें यथाशक्ति आहेर करून ओंटी भरावी ह्मणजे सुनमुख झालें.

## भोजनप्रकार.

ह्याचें मूळ असें आहे कीं, कन्यादानाबद्दल ब्राह्मणभोजन वधूपित्यानें यथाशक्ति करावें. परंतु प्रचारांत असें आहे कीं, प्रथम दिवशीं ह्मणजे लग्न लागलेल्या दिवशीं वराकडील इष्ट व शरीरसंबंधिक बायका पुरुषांसहित भोजनाचा समारंभ होतो.

वराकडे. वधूपित्याकडून बायका पुरुषांचें आमंत्रणें जातें. त्याप्रमाणें ते येऊन भोजन करितात. त्यासमयीं वरास व वधूस एका ताटांत बसवितात. भोजनसमयीं वराच्या हातावर तुपाची आपोषणी वराच्या सासूनें अगर तदभावीं असेल तिनें घालावी, असा आधार आहे. वराकडून वधूस व वधूकडून वरास परस्परांचीं नांवें घेवदून घास देववितात. वाजंत्रें वाजवितात. अशा थाटानें पुरुषांचीं जेवणें झालीं ह्मणजे बायकांचीं जेवणें होतात. तेथें विनोदपर उभयपक्षीं करवल्यांचे उखाणे होतात. त्यांत एकमेकींनीं एकमेकांस लावून उभयपक्षांचीं वर्में कर्में काढण्याची चाल आहे, ती फार अप्रशस्त आहे; कारण त्यामुळें मंगलकार्यांत तंटे व रुसवे उत्पन्न होतात. त्या दिवशींचे अशा रीतीनें प्रकार आटोपल्यानंतर त्याच दिवशीं "ऐरिणीप्रदान" ह्मणजे झाल देण्याचा मुहूर्त योजला असेल तर ऐरिणीप्रदानाचा विधि पुढें सांगितल्याप्रमाणें करून वधूप्रवेश ह्मणजे वधू वरासहित वरगृहीं आणावी; व मुहूर्त त्या दि-

वशीं योजिला नसेल तर वरानें वधूगृहीं रहावें, आणि दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं निजून उठल्या वर मुखमार्जन वगैरे विधि आटोपल्यावर वरमाते- कडे तोंड धुवावयाचें पाणी व विनोदपर कांहीं भाज्यांचीं देठें. न्याहरी, शिधा वगैरे पदार्थ ज्यांस आंब- रणं ह्मणतात तसे देऊन वाजतगाजत वराकडील करवल्यांस बोलावणें व वरपिता माता आदिकरून इष्टमित्र शरीरसंबंधिक वगैरेंस आमंत्रणें ज्यास अ- क्षत असें ह्मणतात, तीं देण्यास कांहीं बायका व कांहीं पुरुष असे वधूपित्याकडून वरगृहीं जातात. तेथें पुरुषांनीं पुरुषांस व बायकांनीं बायकांस आमं- त्रणें देऊन यथाप्रचारें वरमातेस चवरंगावर बसवून पाय धुऊन हळद कुंकू देऊन ओंटी भरतात. व मग परस्पर बायकांस हळद कुंकू देऊन ओंट्या भरतात. पानसुपारी अत्तर गुलाब देऊन आमंत्र- णें देऊन वराकडील करवल्यासहित गेलेली मंडळी परत येते. तों इकडे वर रुसून बसत असतो. त्यास अंगठी अगर धोतरजोडा किंवा दुसरें कांहीं शक्त्यनुसार देऊन वराची समजूत करून आणि-

त्यानंतर वरवधूंकडून सुपाऱ्या लपविणें, विड्या तोडविणें वगैरे खेळ झाल्यावर उभयतांस मांगलिक- स्नान घालितात. तेथें कांहीं खेळ होतात. नंतर वरवधूंस उभयताकडील करवल्यांसहित प्रातःकाळ- चें भोजन होतें. ह्यास करपनाचें भोजन असें ह्मणतात. तें झाल्यावर शिष्टपंक्तीची सिद्धता हो- ऊन प्रथम दिवशींच्या थाटाप्रमाणें स्त्रीपुरुषांचीं भोजनें होतात. असा प्रकार झालव वधूप्रवेश ह्यांस मुहूर्त असेल तेथपर्यंत होऊन नंतर ऐरिणीप्र- दान करावें. तें लग्नदिवसापासून तिसरा दिवस शिवाय करून मुहूर्तावर करावें.

## आतेचीर व आजेवाण.

खालीं दर्शविल्या प्रमाणें ऐरिणीची पूजा होते- समयीं प्रथम वधूच्या आतेस व आजीस मान दे- ण्याची कोठेंकोठें चाल आहे, त्याप्रमाणें योग्य असा आहेर व सोन्याची पुतळी वगैरे देतात. तसेंच कन्यादान सांगतासिध्यर्थ वराची माता, पि- ता व त्यांजकडील मंडळी ह्यांची पूजा वस्त्रादिकें

करून करावी असें शास्त्र आहे. नंतर ऐरिणी-प्रदान करावयाचें.

## ऐरिणीप्रदान म्हणजे झाल.

ही झाल वेळूंची केलेली चांगली मोठी असावी. ती वेळूंची करण्याचें कराण इतकेंच कीं, त्यांस "वंश" असें ह्मटलें आहे; व हा प्रयोगाहि वंशवृद्धीचा आहे, ह्मणून ती झाल वंशांची करावी लागते. त्यांत कणकीचे हळद घालून केलेले पिंवळे दिवे एक मोठा व त्याच्या भोंवतालीं चंधरा लहान असे असून सवस्त्र व पक्वान्नासहित फल, तांबूल, दक्षिणा असें असावें. अशी यथाविधि सिद्धता करून वधूमातापित्यांनीं शुचिर्भूत होऊन झालीसन्निध उत्तराभिमुख बसावें; व तेथें पूर्वाभिमुख वधूवर ह्मांस बसवावें. नंतर वधूपित्यानें झालींत तीन तांदुळांचे ढीग करून त्यांवर तीन सुपाऱ्या ठेवाव्या; व त्यांचें यथाविधि पूजन करून ऐरिणीचीहि यथाविधि पूजा करावी. नंतर वराच्या आचार्याची पूजा करून यथाशक्ति आहेर

करून ऐरिणीची प्रार्थना यथाविधि करावी. नंतर घरमातेची पूजा करून भाहेर करून ऐरिणी- दान यथाविधि द्यावें. नंतर वराची पूजा व आ- हेर करून मळवट भरून वधूवरांस मुंडावळी बांधू- न त्यांच्या मस्तकीं झाल लावावी, त्याच प्रमाणें वरपिता व त्याचे गोत्रजांच्याहि मस्तकीं यथाविधि अनुक्रमें ठेवावी. असें झाल्या नंतर ती झाल वराकडील मनुष्यांनीं सांभाळावी. नंतर वधूमातापित्यांनीं वधूस वरपित्याच्या मांडीवर बसवून असें ह्मणावें.

॥ §अष्टवर्षाइयंकन्यापुत्रवत्पालिता मया इदानींतवपुत्रायदत्तास्नेहेनपाल्यतां ॥ स्मृति.

अर्थ—आजपर्यंत ह्या कन्येचें मीं पुत्रवत् पालन केलें, आतां तुमच्या पुत्रास दिली, तर तुह्मीं स्नेहें- करून पालन करावें. असें ह्मटल्यावर वरपित्यानें वधूच्या मुखांत साखर घालावी. ह्मणजे सदरील वधूपित्याच्या ह्मणण्यास रुकार दिला असें होते.

---

§ कन्येचें वय जितकें असेल तसा ऊह करावा.

नंतर त्याजप्रमाणें वरमातेच्या वगैरे मांडीवर सदरप्रमाणें देऊन आठ ब्राह्मणांस वायनें द्यावीं.

## आंबाशिंपणें.

नंतर आंबाशिंपणें हें कोठें कोठें सुनमुख झाल्यावर-हि करितात. तें असें कीं, उभयतां वधूवरांनीं मागें गौरीहर स्थापन झालेला आहे, त्या ठिकाणीं जाऊन आंबा ह्मणून गाणें आहे, तें सुवासिनींनीं म्हणत असून कालवलेलें कुंकू एका वाटींत घेऊन वरानें हातांत एक पान घेऊन त्या पानानें गौरीहरावर शिंपडावें. हें सौभाग्यदायक आहे.

## वरात व वधूप्रवेश.

वधूप्रवेश ह्मणजे वधूला वरगृहीं नेणें. तें असें कीं, लग्नदिवसापासून सोळा दिवसांच्या आंत वधूप्रवेश करावा. ते नियम जोतिषशास्त्रांत सांगितले आहेत. तशा मुहूर्तावर करावा; व त्या समयीं वधूवरांच्या पदरांस गांठी देऊन वधूपित्याच्या देवघरांत जावें. तेथें देवाचें दर्शन करून नंतर त्या

ठिकाणीं एक धातुमूर्ति अगर गणपतीची मूर्ति कुलाचाराप्रमाणें घेऊन मातापितरांस नमस्कार करून निघावें. त्या समयीं वरपक्षाकडून वधूच्या मातापितरांस व तत्पक्षीय मंडळीस वरात पोचविण्याकरितां निमंत्रण करण्याचा प्रचार आहे. नंतर वधूवर एका वहनावर बसवून मंगलवाद्यांच्या घोषानें उभयपक्षांच्या समाजानिशी समारंभानें नळे, चंद्रज्योती वगैरे दारूकाम सोडीत रस्त्यानें मिरवत वरगृहीं आणावे. ह्यास वरात असें ह्मटलें आहे. वरगृहीं प्रवेश झाला ह्मणजे घरांत आणल्यानंतर श्रीलक्ष्मीचा पुतळा ( मूर्ति ) कणकीचा करून तेथें वरास व वधूस बसण्याच्या जागेपर्यंत दरवजापासून रांगोळीचीं पावलें जमिनीवर काढण्याचा संप्रदाय आहे. कारण ही लक्ष्मीच घरांत येत आहे. ह्मणून एक आसनाचा प्रकार मागें सांगितल्याप्रमाणें करून ठेवावा लागतो त्यावर चौक गव्हांचा करून तशा ठिकाणीं उभयतांनीं बसून स्वस्तिवाचन करवून सुवासिनीनें श्रीलक्ष्मीस व वधूवरांस औक्षण करावें. नंतर श्रील-

क्ष्मीपूजन करावें. नंतर वधूच्या आचार्याचें पूजन वरानें करावें. व तेथें त्यांस दक्षिणा देणें ती कन्यादानविधींत सांगितल्याप्रमाणें द्विगुणित द्यावी हा परिपाठ आहे. नंतर वरमातेनें श्रीमहालक्ष्मीचें झालेल्या पूजनसमयीं दूध शर्करायुक्त दाखविलेल्या नैवेद्याची वाटी घेऊन ती वधूच्या मुखास लावावी. व थोडा अंश तिनें प्राशन केला ह्मणजे तिजला विचारावें कीं "बाई घालीस" तिणें उत्तर द्यावें कीं "सोन्याच्या पावलानें घरीं आलें." तसेंच बाकी राहिलेलें दूध वराच्या मुखीं लावावें व त्यानें प्राशन केलें म्हणजे त्यास मातेनें विचारावें कीं "बा घालास" त्यानें उत्तर द्यावें कीं "लक्ष्मी घेऊन घरीं आलों" असा प्रचार आहे. नंतर वरमातेनें ती दुधाची वाटी ठेवून पाणी हातीं घेऊन मुलीच्या डाव्या कुशीस पाणी लावून ह्मणावें कीं, जशी माझी कूस शीतळ झाली तशी तुझी होवो. ह्मणजे त्यातील अर्थ कीं, जशी मी पुत्रवती आहें, तशीं तू व्हावीस, व आजपर्यंत मीं संसार केला, आतां तू कर. नंतर श्रीलक्ष्मीच्या पुढें दोन ढो-

ग तांदुळांचे ठेविले असतात, त्यांत वरास व वधूस माहीत नसून कांहीं गळ्यांतील एखादा डागिना घालून ठेविला असतो, तो मुलीकडून पाहून काढवितात. व वरमातेस म्हणजे सासूस तिनें सांगावें कीं, "सासूबाई मी चूल, भानूस नीट करीत होतें, तेथें मला हा नवरत्नांचा हार सांपडला" असें म्हणून सासू जवळ द्यावा व तो घेऊन सासूनें मुलीच्या गळ्यांत घालावा. हा प्रचार आहे. नंतर वधूवरांस मातापित्यांनीं आहेर करावा. नंतर मुलीकडून वर सांगितल्याप्रमाणें आठ वायनें देववावीं. व दक्षिणा ब्राह्मणांस यथाशक्ति द्यावी. नंतर सर्वानुमतें मुलीचें नामाभिधान ठेवून त्या नामाचीहि कांस्यपात्रांत पूजा करावी. व आलेल्या सर्व इष्टसमाजांस तें नांव ठेविलेलें सांगून शर्करा द्यावी. व पानसुपारी अत्तरगुलाब वगैरे शिष्टाचार करावा. नंतर गणपतीचें व महालक्ष्मीचें विसर्जन करावें.

## झेंडा नाचविणें.

नंतर कोठेंकोठें मुलीस व मुलास चांगल्या स-

शक्त पुरुषाच्या कडेवर देऊन वाजंत्री वाजवून थोडेंसें त्यास नाचवितात. त्यासमयीं खोबऱ्याच्या वाटींत भंडार ह्मणजे हळद देऊन उधळावी, व कुलदेवतेचें स्मरण करावें, हा कुलाचार आहे. ह्यास झेंडा नाचविणें असें ह्मणतात. नंतर उभयतां वधूवरांनीं देवास व वडील मातापितर वगैरे जे कोणी असतील त्यांस नमस्कार करून जी उभयतांच्या पदरांस वधूगृहीं गांठ दिली आहे ती सोडण्याविषयीं वरानें आपल्या बहिणीस प्रार्थना करावी; तेथें उभयतां वधूवरांकडून तिनें नांवें घेववून कांहीं सौभाग्य देणगी यथाशक्ति लुगडें चोळी घेऊन गांठ सोडावी असामार्ग आहे. वधूप्रवेश विधि झाला.

## कंकण सोडणें.

ह्मणजे वधूवरांनीं वधूच्या माहेरीं येऊन मंगल स्नान करून त्या वेदीवर उभयतां वधूवरांनीं बसावें. आचमन वगैरे करावें. नंतर पूर्वीं लग्न कंकणें ह्मणून जीं उभय वधूवरांच्या हातांत बांधलीं

आहेत तीं सोडावीं. तीं अशीं कीं, वरतीं प्रथम वधूच्या हातांत बांधलें गेलें आहे व मागून वराच्या हातांत बांधलें गेलें आहे. तर आतां प्रथम वराचें मंत्रें करून सोडावें; आणि नंतर तसेंच वधूचें सोडावें. तें वधूनें वराचें व वरानें वधूचें सोडावें. नंतर देवप्रतिष्ठा पूर्वी उठविली नसेल तर उठवावी. यावत्काल पर्यंत देवप्रतिष्ठेचें उत्थापन झालें नाहीं, तोंपर्यंत नित्य मिष्टान्न भक्षण व्हावें, असें आहे. नंतर वराकडे इष्ट ब्राह्मण भोजन व्हावें. त्यास पडभोजन असें ह्मटलें आहे. तसेंच वधूकडे व्हावें. त्यास मांडव पतणें अशी संज्ञा आहे, त्यानंतर पायघड्या, रासन्हाणीं, आठन्हाणीं, दसन्हाणीं, मासन्हाण वगैरे प्रकार आहेत, परंतु येथें जरूर नाहीं ह्मणून घेतले नाहींत.

समाप्त.

Baroda, 13th. December 1881.

I have read the work नीतिविवाहचंद्रिका, compiled by Mr. Rangrao Bhagvant Mande. It is an accurate description of the Marriage ritual, observed amongst the higher classes of Hindoos. Very few understand the meaning of the sacred texts used for it. This attempt to convey the meaning of the texts to all by translating them into Marathi is landable. The work will do useful service to the public.

(Sd.) Vinayek J. Kirtane
Naib Dewan Baroda State.

Baroda, 13th. December 1881.

I have read the manuscript copy of a small work entitled "Niti Vivaha Chandrika," which Mr. Rangrao Mande brought for my perusal. The object of the writen is landable and he has succeeded in giving an accurate description of the several details of the marriage ceremony. In my opinion, the work will do useful service to the Marathi reading public.

(Sd.) Gajanan K. Bhatavadeker
B. A. L. L. B.
Extra Huzur Assistant
Baroda State.

Baroda 17th. December 1881.

I have had the pleasure of reading the नीतिविवाहचंद्रिका, written by Mr. Rungrao Bhagwant Mande. It gives the descriptions of several rituals connected with the marriage ceremonies among the Decanee Hindoos. At present several ceremonies are undergone though the meanings and the origins are not understood by a Majority of people though it is of utmost importance to know such things.

( Sd. ) Rughoonath M. Kelkur
Ag: Suba Baroda State.

Baroda 24th. January 1887

Mr. Mande's work on marriage rituals as obtain among the high caste Hindus especially among the Dekani Brahmins will I believe be useful to the general public. It gives a faithful description of all the marriage ceremonies. Very few understand the shlokas which are recited at the altar. They are binding upon the consorts and their parents for life. I attach much value upon Mr. Mande's attempts to explain these shlokas.

( Sd. ) Hargovind D. R.
Director of Vernacular Instruction
Baroda State.